21-03-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SSK/ 10:30

21-03-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) A-1

SSK/ MAP/ KGS/ 10:30

सभापतीस्थानी मा. उपसभापती

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

(" प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला ")

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करीत असताना खरे म्हणजे सरकारचे काही बाबतीत विशेष अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. भाषणाला सुरुवात कुठून करावी अशा संभ्रमात मी पडलो आहे. परंतु खरे सांगावयाचे तर सगळयात महत्वाच्या आणि ज्वलंत अशा वीज या विषयापासून सुरुवात केली पाहिजे. सरकारने काही चांगली पावले टाकायचे ठरविले आहे त्यामध्ये येत्या पाच वर्षात सरकार 5000 मे.वॅ.वीज निर्मिती करणार आहे. परंतु मला भीती वाटते की, काही दिवसांनी सरकार असे म्हणेल की निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने निवडणुकीनंतर पाळावयाची नसतात. परंतु राज्यपालांच्या अभिभाषणात मांडलेले मुद्दे हे सरकारचे धोरण असते आणि ते पाळावयाचे असते असे माझे मत आहे. माननीय उपमुख्यमंत्री याबाबतीत खुलासा करतीलच. सभापती महोदय, 5000 मे.वॅ.वीज निर्मितीसाठी 25 हजार कोटी रु. लागणार आहेत. हे सर्व पैसे कर्जाच्या रुपाने मिळणार नाहीत. तर किमान 5000 कोटी रु. हे महाराष्ट्र सरकारने स्वत:च्या बजेटमधून वीज निर्मिती या एकाच हेडसाठी आणि स्वत:चे अनुदान किंवा इक्वीटी म्हणून द्यावे लागतील. कारण सध्या वीज मंडळाकडे एक खडकू सुध्दा नाही. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये हे 5000 कोटी रु. द्यावे लागतील याचा उल्लेख तरी करावयाला पाहिजे होता. दरवर्षी किमान दीडहजार कोटी रु. पुढील तीन वर्षात वीज मंडळाला देण्याची तरतूद करायला हवी होती. म्हणून अभिभाषणामध्ये ही लोणकढी थाप मारली आहे असे वाटते. कुठलाही विचार न करता दिलेले आश्वासन किती गांभीर्याने घ्यावयाचे हा प्रश्न निर्माण होतो. मला माननीय उपमुख्यमंत्र्यांना आव्हान द्यावयाचे आहे की, 4 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्र शासनाने केली पाहिजे. 4 हजार कोटी रु. इक्वीटी किंवा अंशदान म्हणून वीज मंडळाला कॅश ग्रॅन्डच्या स्वरुपात दिले पाहिजेत. किमान 4 हजार कोटी रुपयांची तरतूद केली तर त्यानंतर 16 हजार कोटी रु. कर्ज रुपाने उभे करावे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लागतील. असे एकूण 20 हजार कोटी रु. वीज मंडळाला द्यावे लागतील. वीज निर्मिती करणे सोपी

....2

गोष्ट नाही. 5000 मे.वॅ. वीज निर्मितीनंतर त्याची सेलींग प्राईज काय राहणार आहे याचा विचार करावा लागेल. ती 25 हजार कोटी रुपयांची होईल. 12 हजार कोटी रुपयांचा कोळसा ही वीज निर्मिती करण्यासाठी लागणार आहे. तसेच ही वीज विकली गेली पाहिजे. त्यासाठी पर कॅपिटल इनकम वाढले पाहिजे. वीज कोणत्या एरियामध्ये किती विकणार हे ठरविले पाहिजे. ही वीज फक्त पुणे,मुंबई,पिंपरी-चिंचवड आदी भागातच विकली जाणार किंवा मराठवाडयासाठी 1000 मे.वॅ.वीज देणार याचा विचार झाला पाहिजे. 1000 मे.वॅ.वीज दिली तर त्याचे बिल तीन ते साडेतीन कोटी रु. येणार आहे. मराठवाडयातील शेतकरी आज आत्महत्या करीत आहेत.उद्योगधंदे आजारी आहेत. त्यामुळे ही वीज विकत घेण्याची क्षमता आज मराठवाडयातील लोकांमध्ये नाही आणि वीज विकताना ज्या अडचणी येणार आहेत त्याचा विचार शासनाने केला आहे काय ? म्हणून आपले विशेष अभिनंदन करीत असताना जशी निवडणुकीची भाषणे करतो तशाच पध्दतीने राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सुध्दा एक ढोबळ मुद्दा टाकून दिला पुढे त्याचे काय होणार आहे हे परमेश्वरालाच माहीत असेल. म्हणून सरकारचे मी अभिनंदन करतो. सरकारच्या डोळयासमोर ही योजना असली पाहिजे की, " These are our best consumers ".

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

यामध्ये शेतकऱ्यांना, मागास जिल्हयांना, लघु उद्योगांना शासन किती वीज देऊ शकेल हे स्पष्ट झाले पाहिजे. अशा प्रकारचा मास्टर प्लॅन शासनाने तयार केला आहे का, कोणाच्या डोळयासमोर अशी कल्पना आहे का ? हा यक्षप्रश्न आहे. केवळ वीज निर्माण करुन चालणार नाही तर ती इफेक्टिव्हली वहन करावी लागेल, त्याचे मार्केटिंग करावे लागेल व त्यासाठी एकप्रकारची लिंक एस्टॅब्लिश करावी लागेल आणि हे करणे येरागबाळयाचे काम नाही, असे मला वाटते. म्हणून माननीय उप मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात आपल्या खणखणीत भाषणातून स्पष्टीकरण केले पाहिजे. ज्या मराठवाडयाचे पर कॅपिटा उत्पन्न कमी आहे त्या भागात या विजेचे वितरण कशा प्रकारे करता येईल, हा भाग त्यात महत्वाचा आहे.

आरोग्य खात्याच्या संदर्भात बोलतांना मला असे सांगावयाचे आहे की, आरोग्य खाते हे आरोग्य राखणारे खाते नसून आरोग्यहरण करणारे खाते आहे, असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. संपूर्ण ग्रामीण जनतेच्या आरोग्याची दुर्दशा करणारे हे खाते आहे. कारण सर्वात जास्त भ्रष्टाचारी अधिकारी या आरोग्य खात्यामध्ये आहेत. सर्वात जास्त सिव्हील सर्जनवर रेड पडल्याची उदाहरणे आपण डोळयाने पाहिली आहेत. मी एका जॉइंट डायरेक्टरचे नाव घेऊन आपल्यासमोर वस्तुस्थिती मांडू इच्छितो. जॉइंट डायरेक्टर, श्री. डाखोरे यांच्याकडे मलेरिया आणि आरोग्य शिक्षण सेवा असा दोन्ही विभागांचा कार्यभार आहे. आज संपूर्ण मराठवाडयाच्या 30 लाख लोकांना इन्फ्लुएन्झा, फ्ल्यू आणि डेंग्यूसारखे अत्यंत वाईट आजार झालेले असतांना त्या भागात एकच धंदा चालू आहे. ही साथ सुरु असतांना मी सिल्लोडमधील काही गावांना भेटी दिल्या. खुलताबाद, भोकरदन तसेच इतर काही तालुक्यांच्या ठिकाणी गेलो. मला असे पहायला मिळाले की, तेथील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि खाजगी दवाखाने या साथीच्या रुग्णांनी तुडुंब भरलेली आहेत. अशा प्रकारे या जॉइंट डायरेक्टरकडे दोन्ही विभागांचा कार्यभार असल्याने व रुग्णांची भरमसाठ संख्या असल्यामुळे विविध उपाययोजना करण्यासाठी लागणा-या सामुग्री खरेदीतून दर महिन्याला एक कोटी रुपये उत्पन्न त्यांना मिळते व ते एन्जॉय करतात. संपूर्ण राज्य डेंग्युसारख्या आजाराने पछाडलेले असतांना त्या रोगाची लागण झालेल्यांवर उपाय करण्याच्या संदर्भात कोणती उपाययोजना करण्यात येत आहे ? याचा खुलासा झाला पाहिजे. केवळ औषधांची खरेदी करुन

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

चालेल काय ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सुदृढ व निरोगी महाराष्ट्र या धोरणाऐवजी महाराष्ट्र दुर्धर रोगी आणि विकलांग करण्याचे धोरण शासनाने आखले आहे की काय, हे मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून शोधण्याचा प्रयत्न करीत होतो. राज्यातील आरोग्य खात्याच्या कारभारात कोणती सुधारणा करणार, यासंबंधीचा कुठेही अभिभाषणात उल्लेख नाही. या निमित्ताने मी एक दोन बाबी सांगू इच्छितो की, मेडिसीनचा सप्लाय हा कधीच संपत नाही आणि या साथीमध्ये तर 100 कोटीचा धंदा हा मेडिसीनच्या खरेदीपोटी व्यापाऱ्यांचा झाला आहे. मी व्यापाऱ्यांना म्हणालो की, डॉक्टरांना तूम्ही गाडया वगैरे कशा काय देता ? त्याचे उत्तर मला या औषध खरेदीतूनच सापडते. आज राज्यात कुठल्याही प्रकारची स्वच्छता नाही. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उगाचच गृह मंत्री म्हणून कार्यभार घेतला, त्यांच्याकडे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा कार्यभार होता त्यावेळी चांगल्या प्रकारची परिस्थिती आपल्या राज्यात आरोग्याची होती. महाराष्ट्रातील सर्व गावागावात स्वच्छता होती. लातूर नगरपरिषदेला संत गाडगे महाराज स्वच्छता अभियानापोटी दुसरे पारितोषिक मिळाले त्यावेळी तेथील लोकांनी मोर्चा काढला आणि मागणी केली की, आमच्या नगरपालिकेला पहिले पारितोषिक मिळावे. राज्यात आज ठिकठिकाणी डासांचे साम्राज्य पसरलेले दिसून येते व त्यामुळे आरोग्यावर परिणाम होत आहे. हा विषय माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून कुठेही प्रतित झालेला नाही. राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी कोणता प्लॅन शासनाच्या समोर आहे त्याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उहापोह होणे आवश्यक होते. परंतु दुर्दैवाने तसे झालेले नाही. त्यातील पहिला मुद्दा असा आहे की, राज्याचे दरडोई उत्पन्न वाढण्यासाठी शासनाने काय केले पाहिजे ? आपल्या शेजारच्याच गुजरात राज्याचे उदाहरण पहा. या राज्यामध्ये 25 हजार कोटी रुपये शेतीचा जी.डी.पी. झालेला आहे, ॲग्रीकल्चर प्रॉडक्ट 25000 कोटीचे आहे. आपले राज्य त्या मानाने भौगोलिकदृष्टया जवळजवळ दुपटीने मोठे आहे, तरीही आपल्याकडील कृषी उत्पादनाचे प्रमाण गुजरातपेक्षा कमी आहे. तसेच आपल्या राज्यातील कृषी उत्पादनांना मिळणारा भाव व त्यातून काढण्यात येणा-या एकूण उत्पन्नाची आकडेवारी समाधानकारक नाही. Sir, I can name the commodities also. Sir, the State of Gujarat is ahead than State of Maharashtra in the production of

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

agriculture producing such as cotton, sugar-cane and milk. गुजरात राज्य आज कॉटनच्या बाबतीत नंबर वन, शुगर केनच्या बाबतीत नंबर वन आणि आम्ही त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना शिव्या देतो. त्यांना शिव्या देऊन काय ॲचिव्ह करतो हेच मला समजत नाही. खरे तर त्यांचे चरणामृत प्यावे अशा प्रकारचा कारभार ते करीत आहेत. आपल्या महाराष्ट्रासारख्या सक्षम लोकशाही असलेल्या राज्यात अशा प्रकारचा प्रयत्न का होऊ नये याचीच मला खंत वाटते. आपल्या खेडयातील पर कॅपिटा उत्पन्न वाढल्याशिवाय, कृषि उत्पादनाला चांगला भाव मिळाल्याशिवाय तुम्ही त्यांना देणार असलेली वीज हा शेतकरी कसा खरेदी करु शकणार आहे ?

उपसभापती : आपण आता बोलतांना गुजरातच्या मुख्यमंत्र्यांचे चरणामृत प्यावे असा जो उल्लेख केला तसा उल्लेख करणे योग्य होणार नाही. कारण उद्या कोणीही नेता येईल आणि त्याच्या पायाचे चरणामृत प्यावे असा उल्लेख करेल, हे योग्य नाही. त्यामुळे आपण जो उल्लेख केला तो रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : महोदय, मी माझे शब्द मागे घेतो. माझ्या म्हणण्याचा तसा उद्देश नव्हता तर त्यांचे अनुकरण आपण करावे असे मला म्हणावयाचे होते. त्याचे कारण असे आहे की, गेल्या काही दिवसांत गुजरात राज्याबाबत बोलावयाचे झाले तर केवळ सूरत महापालिकाच सुधारली नाही तर ग्रामीण विकासामध्ये फार मोठी क्रांती या राज्याने केली, वीज सरप्लस करुन दुसरीकडे विकण्यापर्यंत त्यांनी नियोजन केले आहे. म्हणून मला असे वाटते की, आपल्या राज्यातील मागास भाग विशेषत: विदर्भ आणि मराठवाडा या भागासाठी विकासाचा दृष्टीकोन समोर ठेवून काम करावयास हवे होते व त्याचे प्रतिबिंब कुठेतरी दिसायला हवे होते.

सभापती महोदय, पाटबंधाऱ्याचा विचार केला तर हजारो कोटी रुपये आपण पाटबंधाऱ्यासाठी खर्च करतो परंतु एवढे करुनही फक्त 50 हजार हेक्टर एवढयाच क्षेत्राला पाणी पुरवठा होईल एवढीच मजल आपण गाठू शकलो. कारण आपल्या राज्यात पाटबंधाऱ्यासाठी फक्त 3000 कोटी रुपयांचे बजेट आहे, दरवर्षी कर्जरोख्यांमधून जो निधी उभा करण्यात येतो त्यातून फक्त टेंडर काढण्याचेच काम आपण करणार असू आणि पाणी साठविण्याकडे कल कमी असेल तर मला वाटते कुठेतरी मोठया प्रमाणात आपल्या राज्याची दुर्दशा झाल्याशिवाय राहणार नाही. गेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

काही दिवसात नियम 93 च्या चार सूचना आल्या आहेत. त्या माध्यमातून असा विषय मांडण्यात आला आहे की, तलावात पाणी साचलेले आहे परंतु डिस्ट्रीब्युशन सिस्टीम कोलॅप्स झाल्यामुळे दोन समाजांमध्ये भांडण झाले. यासंदर्भात कोणीच विचार करीत नाही. केवळ टेंडर काढण्याचेच काम आपल्या राज्यात होत आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

या निमित्ताने मी काही मूलभूत गोष्टी शासनाला विचारू इच्छितो. ज्या गोष्टीमुळे महाराष्ट्राचे आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे पर कॅपिटा इन्कम वाढणार आहे, त्याकडे शासनाचे लक्ष आहे, हे राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये प्रतिबिंबित होणे आवश्यक होते. पण त्या मूलभूत गोष्टी शासन विसरलेले आहे. उपमुख्यमंत्र्यांनी ग्रामविकासासारखे सुंदर खाते सांभाळले होते. पण आज ग्रामविकास कुठे आहे ? ग्रामविकासाची, पाणी पुरवठयाची, ग्रामीण आरोग्य सेवेची शासनाने तीन वर्षामध्ये धूळधाण उडवून टाकली आहे. या तिन्ही विभागाचे मंत्री हे एकाच पक्षातील आहेत. परंतु, त्यांच्यामध्ये समन्वय नाही. परंतु, या तिघांच्या ॲम्बीशनमुळे ग्रामीण महाराष्ट्रातील लोकांची नागरीसुविधेबाबत धूळधाण उडाली आहे. या तिघांचा समन्वय होत नसल्यामुळे ग्रामीण महाराष्ट्र हा पुणे-पिंपरी-चिंचवड येथे आणून बसवायचा शासनाला प्लॅन आहे काय ? 36 हजार कोटी रुपये मुंबईसाठी खर्च करणार आहात, ही चांगली गोष्ट आहे. पण त्यासाठी मराठवाडयातून 50 लाख लोकांनी, पश्चिम महाराष्ट्रातून 20 लाख लोकांनी आणि विदर्भातून 1 कोटी लोकांनी येथे रोजगारासाठी येऊन रहावे असे आपल्याला अपेक्षित आहे काय ? म्हणून मी असे विचारू इच्छितो की, महाराष्ट्राच्या विकासासाठी आपला नेमका प्लॅन काय आहे ? त्यात ग्रामीण महाराष्ट्र हा रिप्रेझेंट होतो काय ? याचा विचार केला पाहिजे. शेवटचा मुद्दा सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो.

येथे श्री.हर्षवर्धन पाटील आहेत. आमचे जेव्हा केंद्रामध्ये सरकार होते, तेव्हा कापसाला 3000 रुपये भाव होता. तुमचे सरकार आले की, कापसाचा भाव रुपये 1500/- होतो. सी.सी.आय.ने 2004 मध्ये जालना सेंटरवर प्रति क्विंटल रुपये 2700 ते 3000 /- या दराने कापूस खरेदी केला आहे. रुपये 3000/- या दराने कापूस खरेदी केल्याचे आकडेसुध्दा उपलब्ध आहेत. किमान काही दिवस हा भाव टिकला ही वस्तुस्थिती आपल्याला माहिती आहे. कापसाला रुपये 3000/- एवढा भाव देण्याचे काम NDA सरकार करू शकते, तर UPA चे सरकार आल्यानंतर कापसाचा भाव रुपये 1500/- का झाला आहे ? याचे उत्तर आपण देऊ शकाल का ? यावेळी आपले मार्केटिंग डिपार्टमेंट कुठे गेले होते ? महाराष्ट्राचे पर कॅपिटा इन्कम वाढणार कसे ? यासंबंधीचे उत्तर आपण राज्यापालांच्या अभिभाषणामध्ये द्यावयास पाहिजे होते.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

कांद्याचा भाव दोन रुपये किलो झाला आहे. शेतीमालाला चांगले भाव मिळण्यासाठी स्ट्रॅटिजी कमोडिटीमध्ये हजार दोन हजार कोटी रुपये गुंतविल्याशिवाय शेतकऱ्यांचे काहीही भले होणार नाही. यासंबंधीचे प्रत्यंतर येथे कुठेही दिसत नाही, हे मला या निमित्ताने निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. एवढे बोलून मी आपली रजा घेतो. धन्यवाद.

...

यानंतर श्री.बोर्डे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. वास्तविक पाहता काल मी, ऑन-लेग होतो. त्यामुळे कालच्या भाषणालाच जोडून माझे भाषण समजण्यात यावे. महोदय, या अभिभाषणावर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी निरनिराळया गोष्टींचा ऊहापोह केला आहे. काल मी पूरामुळे निर्माण झालेल्या आपत्तीसंदर्भातील मुद्दा मांडलेला असल्यामुळे पुन्हा तो मुद्दा मांडून सदनाचा वेळ घेऊ इच्छित नाही. कालचे माझे भाषण मुंबईच्या समस्येपर्यंत येऊन पोहोचलेले होते. त्यामुळे मी तेथून पुढे माझे विचार व्यक्त करीत आहे.

महोदय, मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनिवण्याचे एक स्वप्न माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये रंगविण्यात आलेले आहे. 11 हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे आर्थिक सहाय्यासाठी सादर केलेले आहेत. त्यातील किती प्रस्ताव मंजूर झाले आणि किती नामंजूर झाले माहीत नाही. किती प्रस्तांवाना निधी मिळाला आणि किती प्रस्तावांना निधी मिळाला नाही किंवा मिळावयाचा बाकी आहे हेही माहीत नाही. परंतु नियोजन आयोगाबरोबर अलिकडेच झालेल्या बैठकीमध्ये चालू वर्षात 1 हजार कोटी रुपये तातडीने देण्याची मागणी करण्यात आल्याबाबतचा उल्लेख अभिभाषणामध्ये आहे. मुंबई नागरी सुविधा प्रकल्प, वांद्रे-वरळी सागरी जोडमार्ग व मुंबई नागरी परिवहन प्रकल्प केंद्राची मदत न घेता अगोदरच राबविण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. परंतु मागचे बजेट पाहता केंद्राचा पैसा महाराष्ट्राला किती मिळाला व आता किती मिळेल हे मात्र सांगता येत नाही. ज्यावेळी देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग मुंबईमध्ये आले त्यावेळी त्यांनी सांगितले की, मुंबईचे शांघाय तुमचे तुम्ही बनवा. मुंबईचे शांघाय करण्यासाठी केंद्र सरकारकडे पैसा मागू नका. त्यांनी मुंबईला पैसे देण्यामध्ये अंगठा दाखविला. महोदय, आज राज्यात काय परिस्थिती आहे हे सर्व आपण जाणून आहात. कोणत्याही कामाचे केवळ टेंडर काढावयाचे, कॉन्ट्रॅक्ट दिल्याचे दाखवावयाचे आणि नंतर निधी अभावी प्रकल्प बंद पाडायचे, अशीच आज परिस्थती आहे. त्यानंतर पुन्हा वाढीव किंमतीने कॉन्ट्रॅक्ट मागविण्याचा प्रकार राज्यात घडत आहे. वांद्रे-वरळी सागरी जोडमार्ग या प्रकल्पावर सुरुवातीला 450 कोटी रुपये इतका खर्च येणार होता. परंतु मागील अधिवेशनात याच प्रकल्पाला 1300 कोटी रुपयांची मंजूरी मागितलेली आहे. हे 900 कोटी रुपये कशामुळे वाढले ? माननीय मुख्यमंत्र्यांकडून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगण्यात आले की, कोळयांनी आंदोलन केल्यामुळे पुलाची उंची आणि स्पॅन वाढवावे लागले आणि त्यामुळेच हे 900 कोटी रुपये वाढले आहेत. परंतु जर याबाबत गणित बसविले तर, ही वाढ 100 टक्के जास्त झाल्याचे दिसून येते. मी आपल्याला सांगू इच्छितो की, कोळी बांधवांनी जे आंदोलन केले ते आपली रोजी-रोटी वाचविण्यासाठी केले. माझ्या मते 900 कोटी रुपये पुलाची उंची आणि स्पॅन वाढविण्यावर खर्च न करता, जर त्यातील 450 कोटी रुपये कोळी बांधवांना दिले असते तर त्यांनी आपल्या होडया आणि जाळे शासनाला दान देऊन, पुढील सात पिढया कायमस्वरुपी काँग्रेस पक्षाला मतदान केले असते. परंतु या शासनाने कोळी बांधवांचा विकास न साधता, कॉन्ट्रॅक्टर मंडळीचा विकास साधलेला आहे.

महोदय, मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी मुंबईच्या विकास प्रकल्पांसाठी जागतिक बँक आणि जपान सरकारने आर्थिक सहाय्य देण्याची तयारी दर्शविल्याचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये आहे. परंतु मला तर अशी माहिती आहे की, जागतिक बँकेने मात्र अशा प्रकारचे आर्थिक सहाय्य नामंजूर केलेले आहे, सस्पेंड केलेले आहे. आज ही माहिती उजेडामध्ये आल्याचे आपण सर्वजण जाणत आहात. कारण दोन-चार दिवसांपूर्वी एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यानेच वर्तमानपत्रांमध्ये याबाबतचा गौप्यस्फोट केलेला आहे. मुंबईच्या विकासासाठी जपान सरकार कर्ज देणार आहे. पंरतु माझ्या माहितीनुसार आर्थिक सहाय्याबाबत शासनाचे जपानमध्ये प्रायव्हेट बँकेशी निगोशिएशन सुरु आहे. एकंदरीत "काम चालू, रस्ता बंद" अशी आज सर्वत्र परिस्थिती आहे. राज्यात कोणतेही काम पूर्ण केले जात नसून, केवळ कॉन्ट्रॅक्ट देण्याचेच काम सुरु आहे. पुढील आर्थिक नियोजनामध्ये काय होते ते पहा, असाच केवळ खेळ सुरु आहे. त्यामुळे मी या शासनाचा धिक्कार करतो. माझी तर खात्री आहे की, या शासनाकडून मुंबईचा कसल्याही प्रकारे विकास होणार नाही. मुंबईमध्ये ज्या झोपडपट्टया आहेत त्या तशाच राहणार आहेत. झोपडपट्टी विकास योजना रद्द करण्याचा घाट या सरकारने घातला आहे. माझी सरकारला विनंती आहे की, मोफत घराची जी योजना आहे ती बंद न करता, तशीच सुरु ठेवावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये पोलीस दलाच्या बाबतीत सुध्दा ऊहापोह झालेला आहे. आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, नवी मुंबईतील घणसोलीमध्ये नुकताच उद्रेक झाला. हा उद्रेक कशामुळे झाला यामागील मूळ कारण जर मन लावून पाहिले तर हा उद्रेक शासनाच्या धोरणामुळे झाल्याचे दिसून येईल. कारण या उद्रेकास शासनाचे धोरण निगडीत आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

सभापती महोदय, त्यांच्या जमिनी सरकारने कवडीमोल भावाने विकत घेतल्या आहेत. त्यांच्या जमिनींवर बांधकामे करुन कोट्यावधी रुपयांच्या जमिनी या सरकारने धनदांडग्यांना विकल्या आहेत. त्यामुळे घणसोली, वाशी, बेलापूर येथील जनता चिडलेली आहे. सभापती महोदय, हा उद्रेक सरकारवर आहे, माथाडी कामगारांवर नाही. त्यांचे आणि माथाडींचे काही वैर नाही. त्या जमिनी सरकारने हडप केलेल्या आहेत. अजुनही सरकारने शहाणे व्हावे आणि त्यांना त्या जमिनींचा योग्य तो भाव द्यावा, अशी मागणी मी या ठिकाणी करत आहे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा सामाजिक न्यायासंबंधीचा आहे. मुंबईमध्ये 7 टक्क्यांनी गुन्हेगारांची वाढ झालेली आहे ही गोष्ट आयुक्त देखील कबुल करतात हे मी आबांना निदर्शनास आणून देतो. सामाजिक न्यायासंदर्भात या राज्य सरकारला विसर पडलेला आहे. शासन सामाजिक न्यायासंबंधी एक अक्षरसुध्दा बोलायला तयार नाही. ओ.बी.सीं.बाबत आणि विमुक्त जाती व भटक्या जमातींबाबत कोणतेही धोरण आखण्यात आलेले नाही. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 65 टक्के लोक ओ.बी.सी. आणि विमुक्त जाती व भटक्या जमातींचे आहेत. त्यांच्या विकासासाठी सरकारने कोणताही प्रयत्न केलेला नाही, म्हणून या सरकारचा मी निषेध करतो. त्याचप्रमाणे सभापती महोदय, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच ओ.बी.सी. यांच्यावर क्रिमिलेअरची अट लादली आहे. इतर कोणत्याही समाजाला अशाप्रकारे क्रिमिलेअरची अट लागू नाही. विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच ओ.बी.सी. यांना क्रिमिलेअरची अट लावून शासनाने घोर अन्याय केलेला आहे. तरी, माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच ओ.बी.सी. यांना लावलेली क्रिमिलेअरची अट रद्द करावी, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल, मी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. महाराष्ट्र निर्मितीला 40 वर्षे पूर्ण झालेली आहेत. महाराष्ट्रातील 70 टक्के जनता ही ग्रामीण भागात राहते. परंतु अद्यापही ग्रामीण भागांतील प्रश्न सुटलेले नाहीत, याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. आपल्याला ग्रामीण भागातील शिक्षणाकडे वेगळ्या नजरेने पहावे लागणार आहे. कारण ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसांना त्यांच्या हालाखीच्या परिस्थितीमुळे मुलांना आपल्या गावात किंवा जवळच्या गावातही शिकविणे परवडणारे नाही. ते आपल्या मुलांना शहरातील शाळांमध्ये शिकवू शकत नसल्यामुळे गावात मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा आहेत. तरी, त्या प्राथमिक शाळा अद्यावत झाल्या पाहिजेत. ज्या शाळा कायम विनाअनुदानित तत्वावर चालतात, त्यांना अनुदान दिले गेले पाहिजे. सभापती महोदय, 6 ते 14 या वयोगटातील मुलामुलींना मोफत शिक्षण देणे ही घटनात्मक जबाबदारी आहे. म्हणून ग्रामीण भागात ज्या मराठी माध्यमाच्या शाळा चालतात, त्यांना सुस्थितीत आणण्यासाठी अनुदान दिले पाहिजे. सभापती महोदय, ग्रामीण भागातील रस्ते 20-20 वर्षांपूर्वी केलेले आहेत. त्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासन कधीही एक पैसा ठेवत नाही. हे रस्ते आता रहदारीच्या योग्य राहिलेले नाहीत म्हणून याकडेही शासनाने लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, चार पदरी, सहा पदरी, दोन पदरी रस्ते करण्याकडेच आपण लक्ष देणार आहात का ? ग्रामीण भागातील जनतेला दळणवळणाची सोय उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने हे रस्ते तात्काळ दुरुस्त झाले पाहिजेत. जी गावे अद्यापही मुख्य रस्त्याला जोडावयाची राहिलेली आहेत, ती जोडली पाहिजेत, अशी माझी शासनास विनंती आहे. सभापती महोदय, ग्रामीण पाणीपुरवठ्यासंबंधी आता बऱ्याचशा सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. आबांनी पाणीपुरवठा खात्यामध्ये अत्यंत कर्तबगार व्यक्ती म्हणून काम केलेले आहे. आपण ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या योजनांवर करोडो-अब्जावधी रुपये खर्च करतो. पाणीपुरवठ्याच्या योजनेमध्ये तात्पुरत्या योजनांचा फार मोठा सहभाग असतो. सभापती महोदय, तात्पुरती नळ योजना, विहिरी अधिग्रहित करणे, बैलगाडीने व टँकरने पाणीपुरवठा करणे आणि पाईपलाईनची दुरुस्ती करणे अशाप्रकारच्या अनेक गोष्टींवर शासनाचा पैसा अनाठायी खर्च होत असतो. ग्रामीण भागामध्ये कायमस्वरुपी पाणीपुरवठ्याच्या योजना झाल्या पाहिजेत. तेथील जनतेला पिण्याचे पाणी शुध्द आणि

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड ....

भरपूर मिळाले पाहिजे, याकडेही शासनाने लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, शहरी भागात पाणी दिले नाही तर वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने भरुन येतात, टी.व्ही.वर बातम्या येतात. परंतु ग्रामीण भागातील जनतेला 3-4 दिवस पाणी मिळत नाही याची कोणी दखल घेत नाही. ग्रामीण भागात रहाणारी जनता आपल्याकडे आशेने पाहत आहे. त्या लोकांना पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले पाहिजे, अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड....

सभापती महोदय, यानंतर मी विद्युत पुरवठयाच्या बाबतीत बोलणार आहे. ग्रामीण भागामध्ये 12-12 तासाचे भारनियमन करण्यात येत आहे ते आता सर्वांना सहन न होण्यापलिकडे चालले आहे. कागदावर 12-12 तासाचे जरी भारनियम दाखविण्यात आले असले तरी ग्रामीण भागात प्रत्यक्षात 16 ते 18 तास भारनियमन करण्यात येत आहे. त्यामुळे विद्युत पंप, पिठाच्या गिरण्या बंद राहत आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नाही. ग्रामीण भागात माणसांना जीवन जगणे नकोसे झालेले आहे. आम्ही सर्व मंडळी ग्रामीण भागात राहत असल्यामुळे आम्ही ते दररोज अनुभवतो आहे.

सभापती महोदय, पीक विमा योजना ही वैयक्तिक लाभाची योजना म्हणून शासनाने जाहीर केली पाहिजे. 50 दुकानदांरानी जर विमा काढला असेल व त्यातील एका दुकानाचे जर काही नुकसान झाले तर त्या दुकानदाराला नुकसान भरपाई मिळते. शेतकऱ्यांनी जर पीक विमा काढला तर त्या गावातील 50 टक्के आणेवारी पाहिली जाते, त्या शिवारातील 50 टक्के आणेवारीच्या खाली जर उत्पन्न असेल तर त्यांना पीक विम्याचे पैसे दिले जातात. हे योग्य नाही, ही योजना अत्यंत चुकीची आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, "गांव तेथे ग्रंथालय " अशी शासनाची योजना होती. ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबविण्याचे ठरले होते. मागील वर्षी ग्रंथालयांना अनुदान देण्याची योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला परंतु त्यासाठी एक रुपया देखील तरतूद करण्यात आलेली नाही. असे असतांना अनुदान देण्याची योजना मंजूर कशी केली, त्याचा उपयोग काय ? म्हणून ग्रंथालयांना आधार देण्याची योजना घेतली पाहिजे, सर्व योजना नुसत्या कागदांवरच राहू नयेत, सर्व ग्रंथालयांना पैसा मिळाला पाहिजे त्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली पाहिजे. अशा प्रकारे मी ग्रामीण भागांच्या समस्या मांडलेल्या आहेत त्यांचा विचार व्हावा. आपण शहरी भागाला सुख-सोई व न्याय देत असतांना काही प्रमाणात ग्रामीण भागातील जनतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे अशा प्रकारची सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) :सभापती महोदय, मी सुरुवातीला माननीय राज्यपाल महोदयांना धन्यवाद देऊ इच्छितो. या सदनामध्ये दोन्ही बाजूच्या सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत त्यांना सुध्दा मी धन्यवाद देतो, व माझ्या उत्तराला सुरुवात करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण हे मागील वर्षात केलेल्या कामांचा आढावा घेऊन चालू वर्षात राज्य शासन कोणत्या दिशेने जाणार आहे, राज्य सरकार कोणत्या बाबींवर केंद्रीभूत होऊन काम करणार आहे याची दिशा दाखविणारे अभिभाषण माननीय राज्यपाल महोदय करीत असतात. हे सगळे अभिभाषण बघितल्यानंतर राज्य सरकारचा या वर्षाचा इरादा सन्माननीय सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेच्या निश्चितपणे लक्षात येऊ शकतो. आता आपल्या राज्याची परिस्थिती पाहिली तर अशी कोणतीही नैसर्गिक आपत्ती शिल्लक राहिलेली नसेल की, ती या राज्यामध्ये आलेली नाही. आपण दुष्काळातून सावरत असतांना महाराष्ट्राच्या इतिहासात कधीच पडला नव्हता एवढा प्रचंड पाऊस मुंबई शहरासह राज्यातील 14 जिल्हयांमध्ये पडलेला आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात हाहा:कार माजला अशी परिस्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या अनेक उपायायोजना करुनही थांबलेल्या नाहीत, अशी परिस्थिती असतांना उद्योगाच्या प्रगतीमधील पहिला क्रमांक राज्यांने कायम ठेवलेला आहे. एवढी मोठी नैसर्गिक आपत्ती आलेली असतांना उद्योगातील 31 टक्के वाटा कायम ठेवून 9 टक्के वाढ आपण कायम ठेवलेली आहे. आता राज्य उद्योगामध्ये पहिल्या क्रमांकावर आलेले आहे. ही क्षमता नैसर्गिक आपत्तीमध्ये सुध्दा महाराष्ट्राने कायम ठेवलेली आहे. स्थूल उत्पादनात आपण 13 टक्के वाटा कायम ठेवून इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. पर कॅपिटा उत्पन्नात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. नैसर्गिक आपत्ती असतांना सुध्दा महाराष्ट्रातील जनतेने आपली कार्यक्षमता सिध्द करुन दाखविलेली आहे. त्याच बरोबर अलिकडच्या काळामध्ये बरेच नवे उद्योग उभारुन महाराष्ट्राने परत एकदा झेप घेतलेली आहे अशी परिस्थिती आज आपल्या राज्यात निर्माण झालेली आहे.

(सभापती स्थानी माननीय सभापती)

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.आर.आर. पाटील ...

गेल्या वर्षभरात आलेली नैसर्गिक आपत्ती तसेच राज्य शासनाची आणि राज्यातील जनतेची कामगिरी पाहिली तर निश्चितच उजवी आहे. अतिवृष्टीमुळे मुंबई शहरावर मोठे संकट आले. त्यावेळी राहिलेल्या त्रुटी अनेक जण दाखवतात. परंतु मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या नैसर्गिक आपत्तीमध्ये थेट जनतेला 1200 कोटी रुपयांची मदत करण्याची भूमिका राज्य शासनाने स्वीकारली. ज्यांची घरे वाहून गेली, त्यांना घरे बांधण्यासाठी तातडीने मदत करण्यात आली. ज्यांचे प्रपंच उध्द्वस्त झाले त्यांना धान्य व रॉकेल देण्यासाठी तातडीचे अनुदान देण्यात आले. ज्यांचे शेतीचे नुकसान झाले त्यांना थेट साडेचारशे कोटी रुपयांच्या मदत करुन अजूनही शेतक-यांच्या पाठीशी राज्य शासन ठामपणे उभे राहत आहे, हे शासनाने सिध्द करुन दाखवले आहे. आपत्तीचे स्वरुप मोठे असल्यामुळे काही त्रुटी राहिल्या असतील, अशा परिस्थितीमध्ये ज्याप्रकारे आपण आपल्या त्रुटी पाहतो त्या तुलनेने जर अशाच प्रकारचे संकट दुसरीकडे आल्यास, त्यांच्या बरोबर महाराष्ट्राची तुलना केली तर महाराष्ट्राच्या जनतेने किती आपण किती कार्यक्षमता दाखवलेली आहे हे स्पष्ट होऊ शकेल. तब्बल 1 कोटी 90 लाख लोकांना या पुराचा थेट तडाखा बसला होता. या दरम्यान मोठया प्रमाणात जीवित हानी होऊ नये याची सर्व महाराष्ट्राने दक्षता घेतली होती. या दृष्टीकोनातून 85 लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. आपदग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी पुढे आलेल्या लोकांचा पूर सुध्दा तितकाच मोठा होता. याची प्रचिती सर्वांना आली आहे. महाराष्ट्रातील 14 जिल्हयांमध्ये फिरत असताना सर्व शासकीय यंत्रणा पूरग्रस्तांना वाचविण्यासाठी पाण्यामध्ये उतरलेल्या होत्याच, त्याचबरोबर विविध राजकीय पक्षांचे लोक, स्वयंसेवी संस्थांचे लोक, विविध धार्मिक संघटना मदत करण्यासाठी धावत होते. अशाप्रकारे पूरग्रस्तांच्या पाठीशी महाराष्ट्र किती ताकदीने उभा राहिला याची प्रचिती सर्वांना आलीच आहे. सभापती महोदय, मुंबईमध्ये फिरताना एका ठिकाणी दाखवून देण्यात आले की, वाहून जाणा-या हिंदू तरुणांना मुस्लीम तरुण वाचवत आहेत, रात्रभर आपल्या घरामध्ये सुरक्षित ठेऊन दुस-या दिवशी त्यांच्या घरी पोहचवत आहेत. पुराच्या परिस्थितीमध्ये हिंदू लोकांसाठी मशिदी खुल्या झाल्या होत्या, मुस्लिमांसाठी मंदिरे खुली झाली होती. अशाप्रकारे जाती धर्माच्या भिंती कोलमडून पडल्या होत्या.अशप्रकारे माणूसकीचे चांगले दर्शन महाराष्ट्रातील जनतेने घडवले. याच दरम्यान पूरग्रस्तांना वाचवित असताना तीन पोलिसांना शहीद व्हावे लागले. अशाप्रकारे प्रसंगी आपले प्राण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर. पाटील ...

धोक्यात घालून दुस-यांचे प्राण वाचविण्याची क्षमता पोलीस दलामध्ये असल्याचे, पोलिसांनी आपले कर्तव्य चोखपणे पार पाडून सिध्द करुन दाखवले आहे. त्याच जुलै महिन्यामध्ये अमेरिकेच्या साडेचार लाख लोकसंख्या असलेल्या एका शहरामध्ये कॅटरिनाचे मोठे संकट आले होते. तेथे आपल्या सारखेच पूर आले होते. अमेरिका हा अतिशय पुढारलेला देश आहे. या पुराची माहिती अमेरिकेला तीन दिवस अगोदर समजली होती. सर्व ताकद पणाला लावून सुध्दा साडेचार लाख लोकसंख्येपैकी फक्त 3 लाख लोकांना सुरक्षित स्थळी शिफ्ट करु शकले. उर्वरित दीड लाख लोक 4 दिवस छतावर उपाशी राहिले. त्या ठिकाणी अमेरिकेच्या प्रशासनाची हेलिकॉफ्टरे पोहचू शकली नाहीत, कुठल्याही स्वयंसेवी संस्था जाऊ शकली नाहीत, कुठलाही राजकीय पक्ष जाऊ शकला नाही, पोलीस सुध्दा त्या ठिकाणी जाऊ शकले नाहीत. त्या ठिकाणी कधी मरेल याची शाश्वती नसतांना सुध्दा, एका इमारतीवरुन दुस-या इमारतीवर पोहत जाऊन बलात्कार होण्यास सुरुवात झाली, लुटमारीच्या घटना होऊ लागल्या. त्यावेळी तेथे अमेरिकेच्या प्रशासनाला शूट ॲट साईटचा निर्णय घ्यावा लागला. परंतु महाराष्ट्राला अतिवृष्टीची कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना नसताना 1 कोटी 90 लाख लोकांना पुराचा तडाखा बसलेला असताना त्यापैकी 85 लाख लोकांना आपण सुरक्षित स्थळी हलवू शकलो. एवढे मोठे संकट आलेले असताना सुध्दा एकाही बलात्काराची नोंद नाही, एकही चोरीची घटना घडली नाही, एकही लुटमार झालेली नाही. जेवढे पूरग्रस्त होते, त्यांना मदत करणा-यांचा ओघ सुध्दा तेवढाच मोठा होता. या ठिकाणी महाराष्ट्रातील जनतेला जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे कमीच आहे. आपल्याकडे अनेक साधूसंत होऊन गेले, धर्माच्या चांगल्या शिकवणी आहेत, त्याचा महाराष्ट्राच्या जनतेवर अतिशय चांगला प्रभाव आहे. तसेच प्रशासनाने सुध्दा तितक्याच क्षमतेने या पूर परिस्थितीला तोंड दिले ही बाब सर्वांनाच कबूल करावी लागेल.

(यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

चांगल्या पद्धतीची मदत करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने तर केलेलाच आहे. ही एवढी मोठी संकटे असतानासुद्धा आज काही गोष्टी करण्याचा राज्य सरकारने संकल्प केलेला आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्यातील विजेच्या प्रश्नाबद्दल चिंता व्यक्त केली आणि राज्य सरकार देखील या बाबतीत खंबीरपणे काही पावले उचलत आहे. ही गोष्ट खरी आहे की, राज्यामध्ये ग्रामीण भागामध्ये आज 12-12, 13-13 तास लोडशेडींग करावे लागते आहे आणि त्यामुळे चांगली शेती, चांगला अभ्यास करता येत नाही. घरामध्ये चांगला वीजपुरवठा होत नाही. सभापती महोदय, या संदर्भात या राज्याची 1994 पर्यंतची स्थिती पाहिली तर मला आठवते की, 1994 साली विधानसभेमध्ये मीच एक प्रश्न उपस्थित केला होता. आपण त्यावेळी शेजारच्या राज्यांना वीज विकतो आहोत आणि त्याचे पैसे आपल्याला लवकर येत नाहीत तर मग त्या राज्यांना वीज देण्याचे आपण थांबवित का नाही ? असा प्रश्न मी विचारला होता. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. शरद पवार यांनी उत्तर दिले हाते की, आपण वीज तयार करतो आहोत पण ती वीज साठविता येत नाही आणि त्यामुळे तयार केलेली वीज तशीच वाया घालविण्यापेक्षा शेजारच्या राज्यांना ती विकली तर त्यातून आपल्याला वेळेवर पैसे मिळाले नाही, आजचे उद्या मिळाले तरी किमान शेजारधर्म तरी आपल्या पदरात पडतो. सभापती महोदय, 1994 साली आपला महाराष्ट्र शेजारच्या गोवा, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि गुजरात या चार राज्यांना वीज विकत होता. अशातच एन्रॉन प्रकल्प आला आणि जे टीका करणार नाहीत ते आळशी ठरले. या प्रकल्पावर त्यावेळी टीका करण्यात राज्यातील सगळ्याच विद्वानांनी धन्यता मानली. त्यातच विजेचा सर्वात जास्त वापर करणारे लोक, विजेबद्दल सातत्य ठेवून बोलू लागले. आम्ही सत्तेवर आलो तर हा एन्रॉन प्रकल्प अरबी समुद्रात बुडवून टाकू असे म्हणण्यापर्यंत काहींची मजल गेली. सभापती महोदय, विकासकारणामध्ये, अर्थकारणामध्ये राजकारण आणले तर किती मोठी हानी होते त्याची प्रचिती आज महाराष्ट्र घेत आहे. 1994 साली चार राज्यांना वीज विकणाऱ्या महाराष्ट्राला 2004 साली, आज, शेजारच्या पाच राज्यांकडून वीज विकत घ्यावी लागते आहे. सभापती महोदय, तब्बल 10 वर्षामध्ये या राज्यात वीज निर्मिती होऊ शकली नाही. त्यातील साडेचार वर्षे समोरच्या बाजूची मंडळीच या राज्यात सत्तेवर होती. तेव्हा आज जे विजेचे संकट निर्माण झालेले आहे त्याबाबत अंतर्मुख होऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. हे जे संकट आले आहे ते नेमके

..... एच 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

कोणामुळे आले आहे, त्याला कोण कारणीभूत आहे, परकीय गुंतवणूक या वीज क्षेत्रामध्ये का थांबली ? हेही त्यातून समजून येईल. एन्रॉनचा निकाल लागल्याशिवाय आपण दुसरे प्रकल्प घेऊ शकत नव्हतो आणि त्याबाबतीत जो लवाद आहे तो लंडनमध्ये होता. त्या लवादाने हा एन्रॉन पुन्हा महाराष्ट्राला दिला आणि महाराष्ट्राने आणखी वेगळे प्रकल्प घेतले असते तर अन्य प्रकल्पांसाठी घेतलेले कर्ज आणि या एन्रॉनचे कर्ज हे दोन्ही महाराष्ट्राला पेलले नसते. केंद्रामध्ये 13 दिवसांसाठी आलेले सरकारने एन्रॉनच्या विस्तारीकरणास मान्यता दिली पण हा प्रकल्प बंद झाल्यानंतर पुन्हा सुरू झाला पाहिजे म्हणून तब्बल चार वर्षे आघाडी सरकार केंद्रामध्ये असताना देखील कोणतीच पावले का उचलली नाहीत म्हणून प्रश्न विचारला जाऊ शकतो. परंतु विजेच्या प्रश्नाचा फुटबॉल करून तो एकमेकांकडे टोलविण्यामध्ये आता अर्थ नाही. हा प्रश्न असलाच आणि त्यात चुका असल्याच तर त्याची सुरूवात कोठे झाली याचा अचूक वेध घेऊन या प्रश्नावर मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच आता राज्य सरकारने ठरविले आहे की, 2010 सालापर्यात 7,540 मे.वॅ. वीज निर्मिती या महाराष्ट्रात केली पाहिजे आणि दुसऱ्या राज्यांना वीज विकायची झाली नाही तर किमान वीजेच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी येथे प्रश्न उपस्थित केला की, यासाठी आपण बजेटमध्येही पैसे उपलब्ध करून देणार आहात का ? त्यासाठी आताच्या बजेटमध्ये 500 कोटी ने वाढ तर आपण केलेलीच आहे. परंतु प्रसंग आलाच तर केंद्र सरकारची आणि प्लॅनिंग कमिशनची मान्यता घेऊन वीज निर्मितीसाठी आणखी निधी आपण उपलब्ध करून देऊ. परंतु 2010 सालापर्यंत लोड शेडींगच्या संकटातून महाराष्ट्राची कायमची मुक्तता केली जाईल आणि असेच धोरण आपल्या राज्यात घेतले जाईल याची ग्वाही माननीय राज्यपालांनी या अभिभाषणातून साऱ्या महाराष्ट्राला दिली आहे आणि आता या सरकारच्या वतीने मी देखील पुन्हा आपल्याला तीच ग्वाही देतो. सभापती महोदय, मुंबई ही महाराष्ट्राची आर्थिक राजधानी आहे आणि मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर बनले पाहिजे. येथील नागरिकांबरोबरच देशभरातून येणाऱ्या लोंढ्यामुळे येथील नागरी सुविधांवर ताण पडतो आणि येथील मूळ नागरिकांचे जीवन असह्य बनते आहे. ..

(यानंतर श्री. सरफरे .... आय 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

आणि या स्थितीमध्ये मुंबईतील वहातुकीच्या बाबतीत, पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत, ड्रेनेज सिस्टीमच्या बाबतीत, मेट्रो रेल्वेच्या बाबतीत युध्द पातळीवर उपाय योजना करुन ही कामे करणे काळाची गरज बनली आहे. त्यासाठी मोठे प्रकल्प राज्य सरकारने हातामध्ये घेतले आहेत त्यासाठी लागणारा निधी सुध्दा उपलब्ध झाला आहे. एक गोष्ट कळत नाही की, मुंबईवर हक्क सांगतांना मुंबई ही संपूर्ण देशाची असते परंतु मुंबईची जबाबदारी पार पाडतांना केवळ ती महाराष्ट्राची होते. खरे तर केंद्र सरकारच्या तिजोरीमध्ये कॉर्पोरेट टॅक्स, कस्टम डयुटी देण्यामध्ये मुंबईचा सिंहाचा वाटा आहे. 40 टक्के कर जर मुंबईतून जात असेल तर मुंबईची असहाय्य स्थिती लक्षात घेवून केंद्राने सुध्दा महाराष्ट्राबरोबर काही जबाबदारी उचलण्याची आवश्यकता आहे. माननीय पंतप्रधानांनी त्या दृष्टीने अनुकूल धोरणे उचलली आहेत. व तशी भूमिका त्यांनी यापूर्वी स्पष्ट केली आहे. मुंबईचे प्रश्न सोडविण्यासाठी आऊट ऑफ वे जावून केंद्र सरकार महाराष्ट्राच्या पाठीशी राहील अशाप्रकारची भूमिका केंद्राने यापूर्वी व्यक्त केली असल्यामुळे राज्य सरकारला त्याबाबत पूर्ण खात्री व अपेक्षा आहे. केंद्र सरकारच्या तिजोरीत वाटा टाकण्यामध्ये मुंबईचा सिंहाचा वाटा असेल तर मुंबईमध्ये जे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामध्ये मिठी नदीपासून वहातुकीची कोंडीपर्यंत आरोग्य आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नापर्यंत अनेक प्रश्न आहेत. त्याबाबत केंद्र सरकारने देशाच्या अन्य राज्यांना मदत देण्याचे जे लावलेले निकष त्याप्रमाणे निकष न लावता मुंबईला मदत देण्याच्या धोरणासंबंधी वेगळे निकष लावण्याची आवश्यकता आहे. राज्य सरकारने सुध्दा काही गोष्टी स्वत:च्या बळावर करण्याची गरज होती. त्याप्रमाणे 4526 कोटी रुपयांचा नागरी परिवहन प्रकल्प तीन टप्प्यामध्ये अंमलात आणण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे. या प्रकल्पासाठी 622 कोटी व नागरी पायाभूत सुविधांसाठी 698 कोटी रुपयांची भरीव तरतूद या कामांसाठी केलेली आहे. एकंदरीत मुंबईच्या समस्या सोडविल्या पहिजेत याबद्दल या सरकारचे दुमत नाही. म्हणून अलिकडच्या काळात मिठी नदीपासून एम.यु.टी.पी. प्रकल्प व एम.एम.आर.डी.ए. या सर्व यंत्रणा इ इटकून कामाला लागल्या आहेत. मुंबई देशातील एक आगळे वेगळे शहर करुन दाखविण्याचा संकल्प या राज्य सरकारने केला आहे. मी इतकेच सांगेन की, येत्या तीन वर्षाच्या आत मुंबईची नवी ओळख संपूर्ण जगाला होईल. कात टाकलेली स्वच्छ, सुंदर, नीट नेटकी मुंबई बनविण्याची ग्वाही या सरकारच्या वतीने मी सभागृहाला देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

सभापती महोदय, महाराष्ट्रातील मोठया शहरांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्याला खेडयांच्या समस्या कमी कराव्या लागतील. अन्यथा खेडयातील बेरोजगारांचे लोंढे शहराकडे येत राहतील. आणि त्यामुळे आपण शहरामध्ये केलेल्या उपाययोजना मलमपट्टया ठरतील. त्याचप्रमाणे पाटबंधारे प्रकल्पांना सुध्दा चांगला न्याय देण्याची भूमिका राज्य सरकारने स्वीकारली आहे. या वर्षी 1941 कोटी रुपये नियोजनबध्द पध्दतीने खर्च करुन 1 लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे. हे करीत असतांना 2 बाबींकडे सरकार जरुर लक्ष देईल. एक तर पहिल्यांदा हे राज्य एकसंघ राहिले पाहिजे. दुजाभावाची भूमिका सरकारने आपल्या निर्णयातून पेरता उपयोगी नाही. आणि आम्हाला सापत्नभावाची वागणूक मिळते असे या राज्यातील कोणत्याही विभागाला वाटता कामा नये. आणि म्हणून बॅकलॉग दूर झाला पाहिजे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांच्या लक्षात आणून देईन की, अनुशेष निर्देशांक समितीने आपला अहवाल 1997 मध्ये दिला होता. दोन वर्षे त्यावर निर्णय घेण्याची हिंमत तत्कालीन सरकारने दाखविली नव्हती. त्या अहवालाला मान्यता देवून मी आज आपल्या नम्रपणे निदर्शनास आणून देतो की, निकषाप्रमाणे आम्ही पूर्ण निधी दिला आहे असा माझा दावा नाही. त्यामधून पळवाट काढण्याचा आम्ही प्रयत्न केलेला नाही असाही माझा दावा नाही. हे केल्यानंतर माझा एक दावा असा आहे की, माननीय श्री. गडकरी साहेब या राज्यामध्ये अनुशेष वाढविण्याचे सर्वात जास्त काम कुणाकडून झाले असेल तर ते आकडेवारीनुसार मी आपल्याला दाखवू शकतो की,...

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढें सुरु...

सभापती महोदय, या राज्यामध्ये तत्कालीन सरकारने 2000 सालच्या आत कृष्णा खोऱ्यातील पाणी अडविले पाहिजे, म्हणून निधीचा अंदाज न घेता घाई-गडबडीने कृष्णा खोरे महामंडळ गठीत केले. जसा काशीचा कारागीर सगळीकडे पट्टे पाडत सुटतो, तसे कामाचे भूमीपूजन होत गेले. या राज्यातील कोणत्याही पुजाऱ्याने नारळ फोडले नाहीत, तेवढे नारळ युतीतील लोकांनी फोडले. निधी नसल्यामुळे सगळीच कामे अपूर्ण राहिली. एका बाजूला राज्यावर कर्जे वाढली, दुसऱ्या बाजूला 12 हजार कोटी रुपये खर्च करुन अपेक्षित क्षेत्र ओलिताखाली आले नाही. निधीचा अंदाज घेऊन, नियोजनबध्द जेवढा निधी आहे, तेवढे प्रकल्प हाती घेऊन पूर्ण केले असते, तर कदाचित आता परतावा यायला सुरुवात झाली असती. परंतु असे झाले नाही. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब आपण खरे बोलता, त्यामुळे आपण हेही मान्य कराल. सन्माननीय श्री.गडकरी साहेब हे बांधकाम मंत्री होते. मुंबई-पुणे रस्त्यावर वाहतुकीची फार कोंडी होते असे त्यांना वाटले. त्याबाबतचे आराखडे अगोदरच तयार झाले होते. त्यांच्या या धाडशी स्वभावाप्रमाणे त्यांनी धाडशी निर्णय घेतला.

सन्मानीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी अनुशेषाच्या सबंधात सांगितले. महाराष्ट्रामध्ये जास्त अनुशेष केव्हा वाढला असेल, याबाबत मी बोलण्याची आवश्यकता नाही. पाठीमागचे आकडे पाहिले तर दिसून येईल. युतीच्या काळामध्ये सगळयात जास्त अनुशेष वाढविण्याचे काम झालेले आहे. या अनुशेषासाठी जास्त निधी देण्याचे काम हे लोकशाही आघाडीच्या राज्यामध्येच झालेले आहे. मी सिध्द करुन दाखवितो की, लोकशाही आघाडीच्या राज्यामध्ये अनुशेष दूर करण्यासाठी जेवढा निधी उपलब्ध झाला, तेवढा निधी महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये कधीच उपलब्ध झालेला नव्हता, हे मी बोलण्याची आवश्यकता नाही, ते आकडेवारीवरुनच दिसते. तरी देखील विदर्भ आणि मराठवाड्यातील जनतेच्या मनामध्ये आणखी नाराजी राहू नये, म्हणून अनुशेष दूर करण्याकडे आमचा कल असला पाहिजे, पण त्याचबरोबर कृष्णा खोऱ्यामध्ये 80 टी.एम.सी. पाणी वाया जाता उपयोगाचे नाही. त्यावर कर्नाटक आणि आंध्र राज्यारने त्यावर हक्क सांगता उपयोगाचे नाही. हे पाणी कायमचे गेले तर राज्यकर्ते म्हणून कदाचित आम्ही असो, आम्हाला जाब विचारला नाही तर आपण असाल, महाराष्ट्रातील भावी पिढ्या आपल्याला कधीच माफ करणार नाहीत. म्हणून अनुशेष दूर करण्याकरिता राज्याच्या वाट्याला आलेले पाणी अडविले पाहिजे, त्या पाण्यावर आपला हक्क शाबीत केला पाहिजे. आज विदर्भातील काही तालुक्यांमध्ये ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्स अतिशय कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु.....

आहे. गडचिरोली, नंदूरबार येथे आदिवासी क्षेत्र आहे. शेवटी चार धरणे, चार रस्ते, चार उद्योग इ ाले म्हणजे राज्याचा विकास होऊ शकत नाही. आता जगानेही आपल्या संकल्पना बदललेल्या आहेत. एखाद्या राज्याचा विकास झाला की नाही, हे पहाण्याची परिमाणे जगामध्ये बदललेली आहेत. ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्स पाहून राज्य किती प्रगतीपथावर आहे ? किती पुढारलेले आहे ? किती मागासलेले आहे ? हे निश्चित केले जाते. या राज्यामधील नंदूरबार, धुळे जिल्हा असेल, औरंगाबाद सोडून मराठवाडयातील सर्व जिल्ह्ये असतील, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा हे जिल्ह्ये असतील, या संबंधाने गेल्यावर्षी आणि या वर्षभरात सरकारने काही भूमिका घेऊन विशेष पॅकेजेस दिली. यामुळे खूप अनुकूल परिणाम आज या क्षेत्राला होत आहे. सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी विनोदाने विचारले की, हे सरकार पॅकेज वाटत सुटलेले आहे. विदर्भाच्याबाबतीत बोलायचे झाले तर 770 कोटी रुपयाचे पॅकेज घोषित करण्यात आले होते. मध्यंतरी मी आणि मुख्यमंत्री एका खाजगी लग्नाच्या निमित्ताने आणि खास या कामाचा आढावा घेण्याच्या निमित्ताने नागपूरला गेलेलो होतो. त्यावेळेस सन्माननीय श्री.गडकरी साहेब नव्हते, परंतु तेथील सगळया आमदारांना बोलाविण्यात आलेले होते. त्या ठिकाणी 770 कोटीचे पॅकेजेस घोषित करण्यात आले होते, प्रत्यक्षात पैकी 725 कोटी रुपये तेथे खर्च झालेले आहेत. सभापती महोदय, पॅकेजेसच्या संबंधात फुकट पॅकेजेस वाटता अशप्रकारची टीका का केली जाते, हे समजत नाही. सरकारने निवडणुकीपूर्वी जाहीरनामा घोषित केला. त्यावेळी मी आणि मुख्यमंत्री नव्हतो. सत्तेवर आल्यानंतर काही सन्माननीय सदस्यांनी निवडणुकीतील आश्वासने पाळण्यासाठी नसतात, अशी वक्तव्ये केली. परंतु ही भूमिका व्यक्तीश: मला पसंत नाही. सन्माननीय श्री.गडकरी साहेबांना सांगायचे आहे की, काही वेळा आश्वासने द्यावी लागतात. याचे कारण इतकी वर्षे काँग्रेसने राज्य केले, पण मोठी आश्वासने कधी दिली नाहीत.

यानंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

परंतु विरोधक मोठे झाले आणि त्यांनी आश्वासने देऊन संधी मिळवता येते, सत्ता मिळवता येते हे महाराष्ट्रात सिध्द करुन दाखविले. त्याची पुनरावृत्ती पुन्हा होऊ नये म्हणून कदाचित सरकारला आश्वासने द्यावी लागली असतील. मी नम्रपणे विचारतो की, 40 लाख घरे कोठे आहेत ? 27 लाख नोकऱ्या कोठे आहेत ? एक रुपयामध्ये झुणकाभाकर देण्याचा निर्णय मागे का घेतला ? श्री. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना तो निर्णय घेतला आणि श्री. नारायण राणे मुख्यमंत्री झाल्याबरोबर त्यांचा निर्णय पाठीमागे घेतला. या राज्यामध्ये घेतलेले निर्णय पाठीमागे घेतल्याची उदाहरणे नाहीत काय ? तुम्ही झुणकाभाकरचा निर्णय पाठीमागे का घेतला ? 27 हजार नोकऱ्या कोठे आहेत ? 40 लाख घरे कोठे आहेत ? मग ही मोठी आश्वासने का देण्यात आली होती ? आम्ही सत्तेवर आलो तर वीज मोफत देऊ हे आश्वासन पहिल्यांदा कोणी दिले होते ? अध्यक्ष महाराज, भा.ज.प.-शिवसेनेने हे आश्वासन दिले होते. निवडणुका तोंडावर आल्या होत्या आणि कदाचित ते सत्तेवर आल्यानंतर काही महिन्यासाठी मोफत वीज देतील आणि पुन्हा झुणकाभाकर सारखे आश्वासन मागे घेतील यापेक्षा आपणच ही गोष्ट का करु नये ? अशा सवंग लोकप्रियतेने सत्ता जाण्यापेक्षा "मरता क्या नहीं करता" या पध्दतीने सरकारला ते आश्वासन द्यावे लागले. सभापती महोदय, सरकारला हे आश्वासन द्यावे लागले. त्यामध्ये सरकारचा दोष 50 टक्के असेल तर सरकारला हे आश्वासन देण्यासाठी भाग पाडले याचा 50 टक्के दोष कोणाकडे जातो याचाही आपण विचार करावयास पाहिजे. सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, युती सरकारच्या बहुतांश योजना आम्ही बदललेल्या आहेत. परंतु माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांचे अभिनंदन करतो. त्यांची एक योजना मात्र आम्ही बदललेली नाही. रस्ते हा राज्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण घटक आहे. यामध्ये खाजगी गुंतवणूक झाली पाहिजे. या सरकारचे प्रोजेक्ट्स पाहिले तर 864 कोटी रुपयांचे रस्ते विकासाचे प्रोजेक्ट्स रस्ते विकास महामंडळाने राज्यामध्ये घेतलेले आहेत. बरीच धोरणे आम्ही बदलली परंतु तुमची टोल संस्कृती आम्ही बदललेली नाही. तुम्ही मुरुमाचा रस्ता केला होता त्याचा आम्ही हायवे केला आहे. काही योजनेचे सूत्रधार आणि जनक अभ्यासपूर्ण योजना देत असतात. आपली योजना दिवसेंदिवस मोठी झालेली अहे. अधूनमधून कोठे तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

शिवसेनेचे मित्र एखाद्या टोल नाक्यावर जाऊन तो उचकटून टाकतात. मी त्यांना एवढेच सांगू इच्छितो की, असे करण्यामध्ये काही अर्थ नाही. जगामध्ये सगळीकडे हे सूत्र स्वीकारलेले आहे. माननीय श्री. नितीन गडकरी यांनी हे सूत्र महाराष्ट्रामध्ये रुजविले. खरे म्हणजे हे अपत्य तुमचे आहे परंतु ते आम्ही सांभाळत आहोत. आम्ही ते सांभाळून अधिक बाळसेदार आणि गुटगुटीत केले आहे. तुमची टोल संस्कृती आम्ही चांगली सांभाळलेली आहे. ती आणखी मजबूत केलेली आहे. काळाची गरज म्हणून महाराष्ट्रातील रस्ते चांगले झाले पाहिजेत. युतीच्या काळातील जे चांगले होते ते आम्ही स्वीकारलेले आहे. जे चुकीचे होते ते आम्ही बदललेले आहे. तसे पहावयास गेलो तर आम्ही काहीच बदललेले नाही. त्यानी रस्ता खूप पक्का करुन ठेवलेला आहे. काहीवेळा ते आम्हाला फायदेशीर ठरते तर काही वेळा तोट्याचे ठरते. युतीच्या काळात राज्यामध्ये कशाकशाच्या वाटण्या केल्या होत्या ? त्यावेळी राज्यामध्ये खात्यांच्या वाटण्या केल्या. महामंडळांच्या वाटण्या केल्या. पंढरपूरच्या एकादशीच्या सुध्दा वाटण्या केल्या. आषाढी एकादशी काँग्रेसकडे गेली आणि कार्तिकी एकादशी कायमची आमच्याकडे आली. कधी तरी आषाढी एकादशीला पंढरपूरला जावयाचे म्हटले तर भा.ज.प.कडे जे होते ते तुमच्याकडे आहे असे सांगितले जाते. एकादशी सुध्दा या वाटणीतून सुटलेली नाही. ते आम्ही स्वीकारलेले आहे. माझ्याकडे ग्रामविकास खाते होते तेव्हा काही तरी होत होते असे सन्माननीय सदस्य सांगतात.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 11:25

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

महाराष्ट्रामध्ये काय घडते हे आपण ब-याच वेळा बघत नाही.आपण आपल्या राज्यामध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सुरु केले आहे आणि त्यामुळे स्वच्छतेची चांगली सवय लोकांमध्ये रुजली जात आहे. याच धर्तीवर राज्य सरकारमधील काही अधिका-यांना बोलावून घेऊन केन्द्र सरकारने निर्मल ग्राम पुरस्कार योजना घोषित केली. गेल्यावर्षी देशस्तरावर 39 ग्रामपंचायतींचा माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये महाराष्ट्रातील 13 ग्रामपंचायती होत्या. म्हणजे 1/3 हिस्सा हा महाराष्ट्राचा आणि 2/3 हिस्सा हा संपूर्ण देशाचा होता. स्वच्छतेच्या बाबतीत देशस्तरावर 30 टक्क्यापेक्षा अधिक पुरस्कार राज्याला मिळत असतील तर स्वच्छतेच्या बाबतीत महाराष्ट्र गतीमान आहे ही गोष्ट स्पष्ट होते. सभापती महोदय, आणखी एक धक्कादायक निकाल 4 दिवसापूर्वी लागलेला आहे. देशस्तरावर यावर्षी 781 ग्रामपंचायतींना सन्मानीत केले जाणार आहे. त्यातील तब्बल 338 ग्रामपंचायती एकट्या महाराष्ट्रातील आहेत. या निर्मल ग्राम पुरस्कारामध्ये गेल्या वर्षी महाराष्ट्रातील 1/3 ग्रामपंचायती होत्या तर यावर्षी 50 टक्के ग्रामपंचायती ह्या महाराष्ट्रातील आहेत. आज सगळया जिल्ह्यांचा आढावा घेतला तर जवळ जवळ अडीच हजार ग्रामपंचायती ह्या शंभर टक्के घरोघरी शौचालय असणारी गावे होणार आहेत. निर्मल ग्राम पुरस्कारामध्ये गेल्यावर्षी देशस्तरावर महाराष्ट्राचा 1/3 हिस्सा होता, यावर्षी तो निम्मा आहे आणि पुढच्या वर्षी तर 75 टक्के ग्रामपंचायती ह्या महाराष्ट्रातील असतील. स्वच्छतेच्या बाबतीत खूप मोठी झेप आपल्या राज्याने घेतलेली आहे. स्वच्छतेच्या संदर्भात गावांची संख्या ही वाढत जाणार असून ही एक चांगली गोष्ट महाराष्ट्रामध्ये घडत आहे हे कोणालाही मान्य करावे लागेल. हे सगळे करत असताना राज्यातील कोकणच्या लोकांची नाराजी आहे. उर्वरित महामंडळामध्ये आमच्या समावेश झ ाल्यामुळे आमचा विकास होत नाही अशी त्यांची भावना आहे. सभापती महोदय, मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या भागातील 87 तालुके कायम दुष्काळी आहेत. सर्वच बाबतीत हे तालुके विकासापासून वंचित राहिलेले आहेत. या कायम दुष्काळी असलेल्या 87 तालुक्यांच्या बाबतीत वैधानिक महामंडळ गठित करावे अशा प्रकारचा उल्लेख मी मागील अधिवेशनामध्ये केला होता. जिल्ह्याला पाठविलेला निधी हा जिल्हयाच्या सधन भागामध्ये जातो, दुष्काळी भागापर्यन्त तो पोहोचत नाही. ह्या 87 दुष्काळी तालुक्यांचा सधन तालुक्यांप्रमाणे विकास

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

व्हाययचा असेल तर त्यासाठी एक वेगळे वैधानिक महामंडळ करण्याची शिफारस करण्याचे शासनाने तत्वत: ठरविलेले आहे. माझी अपेक्षा आहे की, यासंदर्भातील प्रस्ताव येणा-या अधिवेशनामध्ये आपल्या समोर निश्चितपणे येईल आणि महाराष्ट्राच्या मागासलेल्या, विकासापासून वंचित राहिलेल्या 87 तालुक्यांनासुध्दा आपणाला चांगला न्याय देता येईल.

सभापती महोदय, राज्यामध्ये सावकारांनी केलेल्या सावकारकीचा उल्लेख काही माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये केला. मी ही गोष्ट कबूल करतो की, केवळ सावकारांचा फायनान्स हे शेतक-यांच्या आत्महत्येचे एकमेव कारण नाही. अधूनमधून येणारी नापिकी, शेतमालाला न मिळणारा भाव, ज्यास्त व्याजाने घ्यावे लागणारे कर्ज, कुटुंबातील माणसांचे आजारपण, मुलींची लग्ने अशा अनेक कारणांमुळे ग्रामीण भागातील गरीब माणून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. उपलब्ध होणा-या आकडेवारी प्रमाणे राज्यामध्ये दरवर्षी 5 हजार आत्महत्या होतात. आत्महत्येची कारणे वेगवेगळी असतात. मुंबईसारख्या शहरामध्ये देखील दरवर्षी एक हजार आत्महत्या होतात अशी आकडेवारी उपलब्ध झालेली आहे. या आत्महत्या करणा-यांमध्ये केवळ गरीब माणसे आहेत अशातला भाग नाही. काही सधन लोक सुध्दा वेगवेगळया कारणामुळे आत्महत्या करतात. महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये वर्षाला 5 हजार आत्महत्या होणे ही बाब भूषणावह नाही. आत्महत्या थांबविण्यासाठी सरकारने ज्या उपाययोजना केलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करायला सुरुवात झालेली आहे. शेतक-यांच्या आत्महत्या होऊ नयेत यासाठी शासन शेतक-यांच्या पाठिशी असेल नसेल त्या ताकदिनिशी उभे राहील. काही डेव्हपमेंटची कामे कमी करु परंतु शेतक-यांना जेथे जेथे मदत करावी लागेल तेथे तेथे ती देण्याची सरकारची भूमिका राहील.

सभापती : अभिभाषणावरील चर्चा संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, शेतक-याला सावकाराच्या दारात जाऊ लागू नये ही शासनाची भूमिका आहे. राज्याचा कर्ता माणूस देशाचा कृषी मंत्री झाल्यामुळे शेतक-यांच्या दृष्टीने चांगले निर्णय केन्द्र सरकारने घेतल्याचे दिसत आहे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शुद्धिपत्रासाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 11:30

श्री. आर.आर.पाटील ...

सभापती महोदय, आजही मोठया प्रमाणात विदर्भात आणि मराठवाडयात को-ऑप.सेक्टरचे नेटवर्क नसल्यामुळे खाजगी सावकाराकडून शेतकरी कर्ज घेतो. राष्ट्रीयीकृत बँका गरीब माणसाला कर्ज द्यायला राजी नाहीत. देशभरातील शेतकऱ्यांना 80 लाख कोटी रुपयांचा अर्थपुरवठा केला जात होता. पवार साहेबांनी आग्रहपूर्वक प्रयत्न करुन यावर्षी 80 लाख कोटींचा अर्थपुरवठा 1 कोटी 45 लाखापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. पुढील वर्षी हा अर्थपुरवठा 1 लाख 75 हजार कोटी इतक्या मोठया प्रमाणात होणार आहे. जवळजवळ दुप्पट अर्थपुरवठा रिझर्व्हबँक आणि नाबार्डकडून शेतीसाठी केला जाणार आहे. ज्यावेळी हा अर्थपुरवठा एवढया मोठया प्रमाणात वाढेल त्यावेळी राष्ट्रीयकृत बँकांना आणि शेडयूल बँकाना अर्थपुरवठा करणे भाग पडेल. सभापती महोदय, ज्या 940 सावकारांवर कारवाई केलेली आहे त्यामध्ये शक्यतो 60 टक्क्याच्या आत व्याज घेणारा सावकर अजून आम्ही पकडलेला नाही. हजारोंच्या संख्येने सावकार आहेत. काही जणांनी सरकारवर याबाबतीत सुध्दा टीका केली. खरे तर सावकारांवर कारवाई केल्यावर सरकारचे अभिनंदन करावयास पाहिजे होते. आजपर्यंत देशातील कोणत्याही राज्याने याबाबतीत कारवाई केली नाही एवढी कारवाई महाराष्ट्र राज्याने केलेली आहे. केवळ बोलका बाहुला हे काम करु शकत नाही. 940 सावकारांना गजाआड करण्याचे काम देशातील कुठल्याही राज्याने आणि आजपर्यंजत कधीच न घडलेले काम करण्याची भूमिका राज्य सरकारने पार पाडली आहे. अजून सुध्दा जे काही छुपे सावकार असतील असतील शेतकऱ्यांना नाडवत असतील आणि अब्रूला हात घालून शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करीत असतील अशा सावकारांचा बंदोबस्त शासन निश्चितपणाने आणि कठोरपणाने करणार याची मी यानिमित्ताने ग्वाही देतो. बालकामगारांच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित केले. केवळ बोलण्याचीच भूमिका राज्य शासनाने पार पाडलेली नाही. वेळोवेळी इशारे दिले. गुजरात हायकोर्टाने गुजरात सरकारला आदेश दिले की महाराष्ट्र सरकारने ज्या पध्दतीने प्रयत्न चालविले आहेत त्याचा अभ्यास करा. अहवाल सादर करा आणि गुजरातमध्ये तशीच उपाययोजना करा. हायकोर्टाच्या डायरेक्शनप्रमाणे गुजरातची टीम महाराष्ट्रामध्ये आली. महाराष्ट्राने केलेल्या कामाचा त्यांनी अभ्यास केला आणि हायकोर्टाला रिपोर्ट दिला आणि गुजरात हायकोर्टाने सुध्दा राज्य सरकारच्या गृह विभागाने केलेल्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. 19000 बालकामगारांची मुक्तता आतापर्यंत केलेली आहे. 1100 बालकामगारांना प्रत्यक्ष

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ताब्यामध्ये घेतले आहे. त्यांच्या गावाकडे त्यांना पोहोचविले. 181 कारखानदारांना पकडून ज्यावेळी तुरुंगाची हवा दाखविली.त्यांना जामीन दिले नाहीत. स्वयंसेवी संस्था आणि पोलीस ठेवले होते. मालकांनी स्वत:हून 18000 मुले त्यांच्या त्यांच्या राज्यात परत पाठविली आहेत. चोरुन अजूनही कुठे हे प्रकार घडत आहेत त्यावर कारवाई केली जाईल. फार अमानुष प्रकार घडत आहेत. माझ्या पुढे अशी मुले उभे करण्यात आली की ज्यांचे वय केवळ सहा वर्षे आहे अशी मुले झोपू नयेत आणि त्यांनी काम करीत रहावे म्हणून त्यांच्या पाठीवर अगरबत्तीने दिलेले चटके बघितले आणि मुलांच्या पाठीच्यापाठी काळयाठिक्कर पडलेल्या दिसल्या. बघवत नाही अशा पध्दतीने लहान मुलांकडून अमानुषपणाने काम करुन घेतले असेल तर ते सहन केले जाणार नाही. अजून सुध्दा राज्यामध्ये पाहिले तर विशेषत: मुंबई शहरामध्ये भुलेश्वर येथे सोन्याचांदीचे दागिने,मदनपुरा जरी व इतर दागिने,धारावीमध्ये जरी आणि चामडयाच्या वस्तू,सायन कोळीवाडी मोटार गॅरेज दुरुस्ती,कुर्ला जरी काम,ठक्करबाप्पा आणि कुर्ला बूट बनविणे,गोवंडी,मेघवाडी,भारतनगर या ठिकाणी अजूनही काही प्रमाणात बालकामगार आहेत. शोध घेतला जात आहे. एक शेवटचा दणका नेटाने दिला जाईल आणि मुंबई शहर बालकामगारमुक्त शहर देशामध्ये पहिल्यांदा करुन दाखविण्यात येईल. आपणही सहकार्य केले आणि बालकामगार दाखवून दिले तर राज्य सरकारला ही गोष्ट करावयाची आहे आणि सरकारची इच्छा आहे एवढेच मी सदनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. सभापती महोदय, आपणच जर आपल्या राज्याची बदनामी करावयाचे ठरविले तर आपल्याला कोण चांगले म्हणेल हा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील जनता किती चांगली आहे,लोक किती चांगले आहेत,यंत्रणा किती चांगली आहे याबाबत मी काही आकडेवारी देऊ इच्छितो.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

आपले महाराष्ट्र राज्य हे असुरक्षित आहे असा अपप्रचार, गैरप्रचार आपणच केला तर कोण या राज्यात येऊन गुंतवणूक करील ? कोण आगीत पैसे टाकीन? म्हणून अशा प्रकारची आपल्याच राज्याची बदनामी करण्याचा प्रयत्न कोणीही करु नये. जगातील अन्य देश आणि आपल्या देशातील इतर मोठया शहरांबरोबर तुलना केली तर आपले राज्य किती सुरक्षित आहे याची प्रचिती आपल्याला येईल. जागतिक स्तरावर गुन्हयांचे प्रमाण हे 1 लाख लोकसंख्या विचारात घेऊन ठरविले जाते. त्यानुसार हे प्रमाण 1 लाख लोकसंख्येच्या पाठीमागे आपल्या राज्यात 156 आहे, दिल्लीमध्ये हे प्रमाण 328 आहे, पाटण्यामध्ये तेच 997, कानपूरमध्ये 749, बंगलोरमध्ये 514 इतके हे प्रमाण आहे. अशा प्रकारे 156 आणि देशातील आणखी कमी 514 बेंगलोरचे प्रमाण याचीच तुलना केली तर आपले राज्य कमी आहे. तसेच एक ते पाच प्रकारचे गुन्हे म्हणजे खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार, अपहरण, दरोडे, जबरी चोरी आणि घरफोडी असे जे गुन्हे आहेत त्यात आपल्या देशातील अन्य राज्यांपेक्षा आपले राज्य सुरक्षित आहे आणि जगात आपला देश किती सुरक्षित आहे हे समजून येईल आणि मुंबई त्यातल्या त्यात कित्येक पटीने सुरक्षित आहे हेही लक्षात येईल. मुंबईत हे प्रमाण 156 आहे, बर्लिनमध्ये 16622, या 16622 आणि 156 ची तुलनाच होऊ शकत नाही. पॅरिसमध्ये हेच प्रमाण 13037, टोकियोमध्ये 2613, स्कॉटलँड मध्ये 8047, हाँगकाँगमध्ये 1299, वॉशिंग्टनमध्ये 7767, लॉस एंजेलिसमध्ये 4968 एवढे आहे. यामध्ये लॉस एंजेलिसमधील प्रमाण 4968 हे सर्वात कमी आहे आणि आपले 156 याचीही तुलना होऊ शकत नाही. आजही माझा विनम्रपणे दावा आहे आणि त्याचे क्रेडिट मी पोलीस दलाला देऊ इच्छित नाही तर लोकांवर अनेक चांगल्या शिकवणूकीचा जो पगडा आहे त्याकडे हे क्रेडिट जाते, म्हणजेच आपले लोक आजही कायदयाचे पालन करणारे आहेत, एकमेकांचे जीवन असुरक्षित न करु इच्छिणारे आहेत, सुरक्षित जीवन जगण्याला महत्व देणारे आहेत. म्हणून जगात आपला देश सुरक्षित आणि देशात आपले राज्य सुरक्षित आहे हे मी या निमित्ताने नजरेस आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, सीमा प्रश्नाच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, सीमा प्रश्न हा जरुर सुटला पाहिजे. माननीय राज्यपालांनी सुध्दा आपल्या भाषणातून यासंबंधीच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत आणि तसा शासनाचाही प्रयत्न आहे. आता ही लढाई सुप्रिम कोर्टात सुरु झालेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

आहे आणि त्यात आपल्या राज्याच्या वतीने एकीकरण समितीला जे सहकार्य द्यावे लागणार ते देण्याची भूमिका शासनाकडून घेतली जाईल. पण बेळगांवमध्ये ज्या पध्दतीने महापौरांबरोबर वागण्याचा प्रयत्न कन्नड भाषिकांनी केला तो निश्चितच निषेधार्ह असाच होता. शासनाने त्यासंबंधी खेद व्यक्त केला आहे. महाराष्ट्रीयन अस्मितेवर, मराठी अस्मितेवर अशा प्रकारे घाला घालण्याचा प्रयत्न कोणीही करु नये एवढेच उप मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या वतीने मी सांगू इच्छितो. या ठिकाणी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत त्यांची उत्तरे विविध खात्यावरील चर्चेच्या माध्यमातून मिळतीलच, बजेटमधून सुध्दा काही उत्तरे मिळतील आणि जे मोठे प्रश्न उपस्थित करण्यात आले होते त्यांची थोडया फार प्रमाणात उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केला आहे. परंतु एवढेच सांगू इच्छितो की, ज्यावेळी एखादी गोष्ट माणसाला आवडते त्यावेळी माणूस गात गात त्या गोष्टीचे वर्णन करतो. मी माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांची अनेक भाषणे यापूर्वीही ऐकलेली आहेत परंतु काल त्यांनी जे भाषण केले त्यात त्यांनी गीते म्हटली. माणूस गीत कधी गातो तर ज्यावेळी एखादी गोष्ट माणसाला आनंद देते त्यावेळी. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा त्यांच्यावर एवढा परिणाम होईल आणि अशा प्रकारे ते गात सुटतील असे मला वाटले नव्हते. यापुढेही अशाच प्रकारे गाण्याचे प्रसंग सातत्याने ठेवून वारंवार आम्ही आपल्याला देऊ. कालचे भाषण सन्माननीय सदस्यांनी गात गात केले म्हणून आम्ही यापुढचा कारभार सुध्दा चांगला करु त्यामुळे आपण नुसतेच गाणार नाही तर नाचत नाचत गाणार एवढा चांगला कारभार आम्ही करु अशी ग्वाही निश्चितपणे मी याप्रसंगी देतो. टीकेसाठी टीका विरोधकांना करावीच लागते, आम्ही त्या बाजूला होतो त्यावेळी आम्ही देखील हेच करीत होतो. बऱ्याच वेळा न पटणाऱ्या गोष्टींबाबत देखील बोलावे लागते परंतु त्याबद्दल ते काहीच बोलले नाही त्यामुळे आपल्या खुर्चीला न्याय दिला असे म्हणता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. भारवि .....

श्री.आर.आर.पाटील...

अध्यक्ष महोदय, मी बारकाईने निरीक्षण केले आहे की, ज्यावेळी आम्ही विरोधी पक्षामध्ये असताना जे बोलत होतो ते आज श्री.नितीन गडकरी बोलत आहेत व श्री.नितीन गडकरी जेव्हा सत्ताधारी पक्षात असताना बोलत होते ते आज आम्ही बोलत आहोत. त्यामुळे माझी पक्की खात्री झाली आहे की, आपल्या लोकशाही देशामध्ये नेते बोलत नाहीत तर खुर्च्याच बोलत असतात. ज्या खुर्चीवर बसलेलो असतो, त्या खुर्चीप्रमाणे बोलावे लागते. विरोधी पक्षाने टीका केली असली तरी ती त्यांनी मना पासून केलेली नाही. आमचे धोरण त्यांच्या मनाला पटते आहे. तरी सुध्दा काही तरी बोलले पाहिजे या भूमिकेतून येथे काही टीका केली जात आहे. त्यांच्या टीका हया सरकारला मार्गदर्शन करणाऱ्याच्या हेतूने होत्या. त्याचा जरूर विचार केल्या जाईल. प्रसंगी आमच्या धोरणामध्ये काही बदल करावा लागला तर तसा बदल देखील करू. नव्या योजना तयार कराव्या लागल्या तर त्या देखील करू. पण जी टीका टीकेसाठी होती, ती आम्ही खुल्यापणाने विसरून जाऊ. एकत्रितपणे चांगला कारभार आपण सगळेजण मिळून करू या.

म.टा.सन्मान कार्यक्रमामध्ये मी श्री.विनोद तावडे यांच्यावर टीका केली नव्हती. भारतीय जनता पार्टीने त्यांच्या ठरावामध्ये मला स्थान दिले होते. खरे तर कुणालाही मोठे करायचे नाही असे आपले धोरण असताना धोरणाला अपवाद का केला हे मला कळले नाही. पण ठरावामध्ये माझा उल्लेख करण्यात आला आणि बोलका बाहुला ही मला उपमा दिली. मला याचे वाईट वाटत नाही. कारण लोकशाहीमध्ये बोलले हे पाहिजेच. म.टा.सन्मान कार्यक्रमामध्ये श्री.रामदास पाध्ये यांचा बोलका बाहुला होता. तो श्री.पाध्ये यांच्यापेक्षा चांगल्या कॉमेंटस् करीत होता आणि लोकांना हसवत होता. त्यावेळी मला देखील बोलावले गेले. सगळा संदर्भ धरून सहज माझ्या मनामध्ये आले की, देशभरातील सगळया बोलक्या बाहुलांची एखादी संघटना तयार करता येईल काय ? ती कोणाच्या नेतृत्त्वाखाली करता येईल ? तसे जर करायचे ठरविले तर ती श्री.प्रमोद महाजन साहेबांच्या यांच्या नेतृत्त्वाखाली करावी लागेल. त्याचे उपाध्यक्षपद द्यावयाचे झाले तर ते श्री.नितीन गडकरी यांना द्यावे लागेल. श्री.महाजन यांच्या अध्यक्षतेखाली, श्री.गडकरी यांच्या उपाध्यक्षतेखाली त्या संघटनेमध्ये मी सदस्य म्हणून देखील काम करायला तयार आहे.

सभापती महोदय, राज्यपालांनी चांगले अभिभाषण केले आहे. त्यांचे सदनाच्यावतीने अभिनंदन करावे, अशी सूचना मी सदनाला करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अर्थसंकल्प हा गोपीनीय असतो. असे असताना येथे उप मुख्यमंत्र्यांनी या वर्षासाठी पाटबंधारे खात्यासाठी 1901 कोटी रुपयाची तरतूद केली आहे, असे सांगितले. असे वाक्य मंत्रिमहोदय मघाशी बोलले आहेत. यासाठी आपण रेकॉर्ड तपासून बघावा. असे जर असेल तर तो गोपनियतेचा भंग आहे.

सभापती : मी रेकॉर्ड तपासून पाहतो. आपण जो आकडा सांगत आहात तो मी देखील ऐकलेला नाही.

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित करुन, मला मार्गदर्शनही केले. वेगवेगळया जातींचे जे मेळावे आयोजित केले जातात त्या मेळाव्यांना जाऊ नये, अशी सूचना श्री.गडकरी यांनी केली आहे. समाजातील वेगवेगळया जातीचे जे प्रवर्ग आहेत त्यांच्यासाठी योजना आखणे, त्यांच्या विकासासाठी निधी देणे व त्या संदर्भात राज्यकर्त्यांकडे अडचणी मांडणे यामध्ये काही गैर आहे असे मी मानत नाही. पण एका गोष्टीशी मी सहमत आहे. सामाजिक मागासलेपणाच्या निकषावर आपण काही सवलती देतो. परंतु आज उच्च जातीमध्ये सुध्दा गरीब लोक आहेत. त्यांच्या मुलांना परिस्थितीमुळे शिक्षणासारख्या क्षेत्रातून ड्रॉप-आऊट व्हावे लागत आहे. उच्च जातीमध्ये जन्मलेली, परंतु, परिस्थितीने गरीब असलेली मुले शिक्षणाच्या क्षेत्रात ड्रॉप आऊट होता कामा नयेत व अशाने महाराष्ट्राच्या चांगल्या मनुष्यबळाची हानी होऊ नये म्हणून अशा उच्च जातीतील गरीब मुलांसाठी सुध्दा स्कॉलरशीप देण्याचा विचार करु असे मी नागपूर मध्ये म्हटले होते. अशाप्रकारे सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्यांना पुढे आणण्यासाठी आम्ही प्रयत्नही करीत आहोत.

सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा संपलेली आहे. आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

....

..यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहापुढील सकाळच्या सत्रातील कामकाज सपंलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 45 मिनिटांनी,
दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी. / मु.शी. : तोंडी उत्तरे

वरीष्ठ श्रेणीतुन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देण्याबाबत
विद्यापीठ अनुदान आयोगाचा खुलासा

(१) * १२८६९ श्री. सुधाकर गणगणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : ता.प्र.क्र.९२८८ ला दिनांक १२ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षण संचालकांच्या परिपत्रकामध्ये वरिष्ठश्रेणीत ५ वर्षे सेवा पुर्ण झाल्यानंतर निवडश्रेणीत स्थान निश्चिती करण्यात येईल, या वाक्याऐवजी वरिष्ठश्रेणीत ५ वर्षाची अट असण्याची आवश्यकता नाही. अशी सुधारणा करण्यात आल्यानंतर व शासनाने सुध्दा १७ जून, २००५ च्या पत्रान्वये तसा खुलासा करण्याऱ्या सूचना दिल्यानंतर या आदेशाच्या प्रत्यक्ष अंम्मलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(२) अम्मलबजावणी झाली नसल्यास, याबाबत विलंब होण्याची निश्चित कारणे काय आहेत,

(३) शासन खुलाशाप्रमाणे आतापावेतो विभागवार किती प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत,

(४) अजूनही प्रलंबित असलेल्या विभागवार प्रकरणांची संख्या किती आहे ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (१) अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

(२) प्रत्यक्ष अंमजबजावणी झाली असल्यामुळे विलंब होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) पुणे :- ११७७
मुंबई :- ८१६
कोल्हापूर :- १०६१
औरंगाबाद :- ३१६
नांदेड :- २५६
जळगाव :- ४९०
नागपूर :- ५७३
अमरावती :- २८५
वरीलप्रमाणे एकूण ४९७४ प्रकरणे निकालात काढलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये, दिलेली आकडेवारी निरनिराळ्या स्तरावरील 4974 प्रकरणे निकाली काढल्याबाबत, देण्यात आल्याचे सांगितले आहे. सभापती महोदय, ही आकडेवारी फक्त टेबलवर काढलेली आहे. तरी, माननीय मंत्रीमहोदयांना माझा प्रश्न आहे की, ज्यांना प्रत्यक्षात फायदा मिळायला पाहिजे होता, त्यांना याचा फायदा मिळाला नाही, हे खरे आहे का ? ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 12869

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दिलेले आकडे हे महाराष्ट्रातील फॅक्च्युअल प्रकरणांचे आकडे आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ज्यांच्या केसेस किंवा प्रकरणे आलेली नाहीत, त्यांच्याबद्दल मी बोलत नाही. या संदर्भातील 4974 प्रकरणे निकालात काढलेली आहेत, असे आपल्या उत्तरात आपण म्हटले आहे. वेतनपत्रकात आठ दिवसांत दुरुस्ती करु असे आपण सांगितले होते. तरी, त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे का ?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

प्रा. बी.टी.देशमुख : ठीक आहे. मग या संदर्भातील प्रश्न संपला आहे. सभापती महोदय, दिनांक 24 डिसेंबर, 1978 ला यु.जी.सी. चे जे नोटीफिकेशन आहे, त्याप्रमाणे माननीय मंत्रीमहोदयांनी निर्णय घेतला. परंतु डायरेक्टरने चुकीचे परिपत्रक काढले. या संदर्भात शासनाने दिनांक 17 जून, 2005 ला खूलासा केला. माननीय मंत्रीमहोदयांनी स्वत: ही सर्व कागदपत्रे पाहून संबंधितांकडून क्लेरिफिकेशन मागितले. चुक दुरुस्त करा, असे त्यांनी सांगितले आणि त्याप्रमाणे चुक दुरुस्त झाली. आता या प्रकरणी वेतन निश्चितीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे वेतन मिळत आहे का ? 1-2 वर्षामध्ये थकीत बाकी 3 महिन्यांत देऊ असे माननीय मंत्रीमहोदयांनी म्हटले होते. तरी, त्याप्रमाणे थकीत बाकी 3 महिन्यांत दिली का ? आणि दिली नसेल तर किती दिवसांत देण्यात येईल ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या संदर्भतील कॉस्ट साडे सत्तावीस कोटी रुपयांची आहे. या संदर्भात आपल्याला बजेटरी प्रोव्हिजनमध्ये काही करावे लागेल. त्याप्रमाणे आता आम्ही करुन घेऊ.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मागील वेळीही माननीय मंत्रीमहोदयांनी या संदर्भात तीन महिन्यांत कार्यवाही करु असे सांगितले होते. एखादा निश्चित असा कालखंडा दिला तर विभाग त्याप्रमाणे काम करतो. तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना पुन्हा प्रश्न आहे की, या संदर्भातील कार्यवाही किती दिवसांत पूर्ण केली जाईल ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, पुढील सप्लीमेंटरी बजेटमध्ये आम्ही हे घेणार आहोत.

अशोधित प्रत / मुद्रणेसाठी नाही

ता.प्र.क्र 12869

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या संदर्भात शासनाने देऊ नका, असे म्हटले असताना देखील हा निर्णय झाला. काही जॉईंट डायरेक्टर्सनी आर्थिक गैरव्यवहार करुन निवडक लोकांना देऊन टाकले. त्यांना शोधून त्यांच्यावर ॲक्शन घेण्याबाबत सांगण्यात आले होते. डायरेक्टरने चुकीचा निर्णय घेऊन काही निवडक लोकांबरोबर फिक्सेशन केले हे काही बरोबर नाही. मागील वेळी देखील मी हे सांगितले होते.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे त्यांनी केले असेल तर त्यांची एक महिन्याच्या आत चौकशी करु असे आश्वासन देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे चौकशी करण्यात आलेली आहे काय ? व त्यांच्यावर ॲक्शन घेतली आहे काय ? ॲक्शन घेतली असेल तर काय ॲक्शन घेतलेली आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सभागृहामध्ये आदरणीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात आश्वासन दिले होते. त्या संदर्भात आम्ही चौकशी करुन 25 ऑक्टोबर, 2005 रोजी डायरेक्टर, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमलेली आहे. सदर कमिटीचा अहवाल 1 महिन्यामध्ये येईल त्यानंतर यामध्ये जे जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक जिल्हयामध्ये उपस्थित झालेला आहे. विशेष करुन नागपूर जिल्हयामध्ये या संदर्भातील बऱ्याच केसेस आहेत. याबाबत अजून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून या प्रकरणांची चौकशी करुन 1 महिन्याच्या आत कार्यवाही करण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, फक्त नागपूर जिल्हाच्या संदर्भातच चौकशी करणार नाही तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये याबाबतीत गोंधळ झालेला असला तरी सर्वांची चौकशी करण्यात येईल. कमिटी स्थापन केलेली आहे त्याचा अहवाल एक महिन्यांमध्ये येईल. अहवाल आल्यानंतर पुढील एक महिन्यांमध्ये सर्वांवर कारवाई करण्यात येईल.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खडकवाडी (ता. हवेली, जि.पूणे) येथील दीड महिन्याच्या मुलीचा ट्रिपल पोलिओच्या लसीकरणानंतर झालेला मृत्यू

(२) * १४४९५ श्री. शांताराम करमळकर , श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली तालुक्यातील (जि. पुणे) खडकवाडी येथे दीड महिन्याच्या मुलीचा दिनांक १८ जानेवारी, २००६ रोजी वा त्या सुमारास ट्रिपल पोलिओच्या लसीकरणानंतर चोवीस तासात मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (१) मृत्यू दि. १६.१.२००६ रोजी झाला. तथापि, सदरचा मृत्यू पोलिओच्या लसीकरणामुळे झालेला नाही.

(२) नाही.

(३) होय. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा लसीकरण अधिकारी व बालरोग तज्ज्ञ, यांचे पथकाने चौकशी केली आहे.

(४) ट्रिपल पोलिओची लस निर्दोष असल्याचे तपासणीत आढळल्याने मुलीचा मृत्यू सडन शॉक सिड्रोम हायपोटेन्सिव्ह इपिसोड, ॲसपीरेशन या पैकी एका कारणांनी झाला असण्याची शक्यता वर्तवण्यांत आली आहे. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न आला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, प्रश्नाचे उत्तर असे दिलेले आहे की, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा लसीकरण अधिकारी व बालरोग तज्ज्ञ, यांच्या पथकाने चौकशी केली आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, ट्रिपल पोलिओची लस निर्दोष असल्याचे तपासणीत आढळल्याने मुलीचा मृत्यू सडन शॉक सिंड्रोम हायपोटेन्सिव्ह इपिसोड, ॲसपीरेशन या पैकी एका कारणांनी झाला असण्याची शक्यता आहे असे म्हटलेले आहे. परंतु हा मृत्यू नक्की कशामुळे झालेला आहे याबाबत काहीही सांगिलेले नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ट्रिपल पोलिओची लस दिल्यानंतर त्याची रिॲक्शन ४ तासामध्ये होऊ शकते. असे सायंटिफिक तज्ज्ञांनी सांगिलेले आहे. सदर मुलीस सकाळी साडेनऊ वाजता लस देण्यात आलेली आहे व मुलीचा मृत्यू हा १० तासानंतर झालेला आहे त्यामुळे या मृत्यूशी ट्रिपल पोलिआच्या लसीचा काहीही संबंध येत नाही असे आम्ही सांगितलेले आहे.

.....३.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : आपण येथे शक्यता वर्तविलेली आहे मृत्यू झाला त्याबाबतीत नक्की म्हणणे काय आहे ते का सांगण्यात आलेले नाही. What is the concrete cause of death?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ट्रिपल पोलिओच्या लसीमुळे हा मृत्यू झालेला नाही It might be due to shock syndrome. त्या गावांमध्ये एक कार्यक्रम होता म्हणून त्या मुलीच्या नोतेवाईकांनी पोस्टमार्टम करण्यास नकार दिला. आमचे अधिकारी पोस्टमार्टेम करण्यासाठी तेथे गेले होते.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले की, नातेवाईकांनी विरोध केल्यामुळे पोस्टमार्टम करण्यात आलेले नाही, हे कायद्यामध्ये बसते काय ? पोस्टमार्टमचे नियम असतात. २४ तासाच्या आत मृत्यू झाला असेल तर पोस्टमार्टम करावेच लागते. नातेवाईकांनी विरोध केला हे कारण देणे योग्य नाही.

यानंतर श्री. सांगळे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14495 ...

श्री.मधुकर सरपोतदार ...

मृत्यूनंतर पोस्टमार्टेम केले जात नाही असे कधीही घडत नाही. पोस्टमार्टेम करु नये अशी विनंती करणे ही चूकीची बाब आहे. मृत्यूचे कारण कळण्यासाठी पोस्टमार्टेम करणे अत्यंत महत्वाचे असते. त्यामुळे या ठिकाणी झालेल्या घटनेवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला जात आहे ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री.सुरेश शेट्टी : मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रयत्न केलेला नाही. मुलीच्या आई-वडिलांनी आणि गावक-यांनी हा नैसर्गिक मृत्यू असल्यामुळे मुलीचे पोस्टमार्टेम करु नये अशी तेथील अधिका-यांना विनंती केली होती. आमच्याकडे सुध्दा अनेक वेळेस अपघाताच्या केसेस येत असतात, त्यामध्ये सुध्दा त्यांच्या नातेवाईकांकडून पोस्टमार्टेम न करण्याची विनंती करण्यात येत असते.

सभापती : कोणत्याही प्रकरणामध्ये 24 तासाच्या आत एखादी व्यक्ती किंवा लहान मूल मृत्यू पावल्यास त्याचे पोस्टमार्टेम करावे लागते अशा पध्दतीचा नियम आहे. परंतु या केसमध्ये पोस्टमार्टेम झालेले दिसत नाही. या ठिकाणी सन्माननीय मंत्रिमहोदयांनी, मुलीच्या आई-वडिलांनी आणि गावक-यांनी हा नैसर्गिक मृत्यू असल्यामुळे मुलीचे पोस्टमार्टेम करु नये अशी तेथील अधिका-यांना विनंती केल्यामुळे पोस्टमार्टेम करण्यात आले नाही असे सांगितलेले आहे. त्या ठिकाणी कार्यरत असलेले वैद्यकीय अधिका-यांनी सदर मुलीचे पोस्टमार्टेम करुन आपले कर्तव्य पार पाडणे गरजेचे होते.

श्री.सुरेश शेट्टी : त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिका-यांनी मृत मुलीचे पोस्टमार्टेम करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी पोस्टमार्टेम केले नाही ही बाब खरी आहे.

(गोंधळ)

श्री.पांडुरंग फुंडकर : कोणत्याही केसमध्ये जर अशा प्रकारची घटना घडली असेल तर पोस्टमार्टेम करणे आवश्यक असते. ही जबाबदारी डॉक्टरांची असते, तसेच अपघाताच्या संदर्भात पोस्टमार्टेम करुन घेण्याची जबाबदारी पोलिसांची सुध्दा असते. अशाप्रकारे दोघांची संयुक्तिक जबाबदारी असताना या ठिकाणी पोस्टमार्टेम करण्यात आलेले नसल्यामुळे त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14495 ...

श्री.सुरेश शेट्टी : या प्रकरणी संबंधित डॉक्टरांवर कारवाई करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : ही घटना ज्यावेळी घडली त्यावेळी जवळपास पाऊण तास त्या ठिकाणी हूज्जत झाली होती. सदर मुलीचा मृत्यू हा ट्रिपल पोलिओच्या लसीमुळे झालेला नसल्याचे या ठिकाणी सांगण्यात आले आहे. त्यावेळी त्या लहान मुलीच्या मृत्यू कोणत्या कारणामुळे झाला आहे याबाबतची तपासणी करुन डॉक्टरांनी प्रमाणपत्र दिलेले असेल, सदर लहान मुलीचा मृत्यू कोणत्या कारणामुळे झाला ?

श्री.सुरेश शेट्टी : या प्रकरणामध्ये मुलीचे पोस्टमार्टेम झालेले नाही.

(गोंधळ)

सभापती : आपण सर्वांनी एकाच वेळी उभे राहून प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केल्यास मी पुढच्या प्रश्नाकडे जाईन.

श्री.विनोद तावडे : माझ्या स्पेसिफिक प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले नाही.

सभापती : या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये या प्रकरणी मुलीचे पोस्टमार्टेम झालेले नसल्यामुळे मृत्यूचे कारण देण्यात आलेले नाही असे सांगितलेले आहे. त्या मुलीला सकाळी ट्रिपल पोलिओचे इंजेक्शन दिल्यानंतर 10 तासांनी मुलगी वारली असे सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचे म्हणणे आहे.

(यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14495....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कोठल्याही प्रकारे मृत्यू झाल्यानंतर अंत्यसंस्कार करण्यापूर्वी त्या मृत्यूबाबतचे डॉक्टरचे डेथ सर्टिफिकेट लागते. तेव्हा या बालकाच्या बाबतीत कोठल्या तरी डॉक्टरने डेथ सर्टिफिकेट दिले असणारच. तेव्हा त्या डेथ सर्टिफिकेटमध्ये डॉक्टरने मृत्यूचे कारण काय दिलेले आहे ते आपण सांगावे. डेथ सर्टिफिकेट असल्याशिवाय स्मशानामध्ये मृतदेहावर अंत्यसंस्कार करताच येत नाहीत.

श्री. सुरेश शेट्टी : सदर डेथ सर्टिफिकेटमध्ये काय लिहिले आहे ते तपासून घेऊन मी डेथ कॉज काय आहे ते सभागृहाच्या पटलावर ठेवतो. परंतु सन्माननीय सदस्य श्री. तावडे यांनी ट्रिपल पोलिओ संबंधी सांगितले ती संपूर्ण बॅच, दोन्ही लशींचे नमुने आपण तपासणीसाठी कसोली येथील सेंट्रल रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये पाठविले होते त्याचा अहवाल आपल्याकडे आलेला आहे. आणि त्यामध्ये ते दोन्ही लशींचे नमुने स्टँडर्डचे होते असे निष्पन्न झाले आहे. त्या लशींमध्ये काहीही गैर नव्हते.

***

..... टी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुधारित वेतनश्रेणीत निवृत्त होणे पण असुधारीत वेतनश्रेणीचे निवृत्तीवेतन मिळत असल्याबाबत

(3) * 13109 **प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 19 डिसेंबर, 2005 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक 9813 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांच्या बाबतीत 17 जानेवारी, 2004 च्या शासननिर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेली असली तरी त्याबाबत महालेखाकार कार्यालयाला कोणत्याही सूचना पाठविण्यात आलेल्या नसल्यामुळे ते सुधारित वेतनश्रेणीत निवृत्त होत असले तरी त्यांचे सेवानिवृत्ती वेतन सुधारित वेतनश्रेणीनुसार निश्चित करण्यात येत नाही असे उपमहालेखाकार (नागपूर) यांनी 10 मार्च, 2005 रोजी, सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना पत्र (क्रमांक पीआर 4/आर 5/ओसी/400/04-05) पाठवून कळविले तसेच शेकडो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यामुळे सेवानिवृत्ती वेतन निश्चितीमध्ये अकारण अडचणी निर्माण होत आहेत अशी तक्रार करणारे एक निवेदन महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटनेच्या सरचिटणीसांनी दिनांक 3/29 ऑक्टोंबर, 2005 रोजी किंवा त्यादरम्यान प्रधान सचिव तंत्र शिक्षण विभाग यांना सादर केलेल्या तक्रारीच्या संदर्भात आवश्यक ती अधिसूचना निर्गमित करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(2) असल्यास, उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(3) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (1), (2) व (3) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांना दि. 17 जानेवारी, 2004 च्या शासन निर्णयान्वये सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील तनतुदीनुसार कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करताना काही अडचणी निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे या शासन निर्णयात सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. त्या प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. सुधारणा झाल्यानंतर वित्त विभागामार्फत अधिसूचना निर्गमित करण्यात येईल. अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर मा. महालेखापाल यांचेकडून सेवानिवृत्त वेतन निश्चितीची प्रकरणे निकाली काढणे शक्य होईल. ही बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने काही कालावधी लागत आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने या उत्तरामध्ये थोडी दुरूस्ती करावयाची आहे. या उत्तरामध्ये "... त्यानुसार दिनांक 20 मार्च 2006 च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करून शुद्धीपत्रिका निर्गमित करण्यात आली आहे. वित्त विभागास सदर शासन निर्णयानुसार अधिसूचना निर्गमित करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे." असा मजकूर उत्तराच्या शेवटी मला जोडावयाचा आहे. याप्रमाणे उत्तर दुरूस्त करून छापल्याप्रमाणे.

..... टी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13109 ...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, थोडीशी गडबड झाली आहे. मला वाटले होते की, या प्रश्नाचे ऐतिहासिकपण गमावले जाते की काय ? पण तसे झाले नाही. सभापती महोदय, या प्रश्नाचे ऐतिहासिकपण यासाठी आहे की, गेल्या 20-25 वर्षांमध्ये मी पहिल्यांदाच पाहतो आहे की, शासन निर्णय काढला, त्याप्रमाणे वेतनश्रेणी दिली गेली. त्याप्रमाणे संबंधितांना ती वेतनश्रेणी मिळूही लागली. पण तो मनुष्य निवृत्त झाल्यावर मात्र त्याला असे सांगितले जाते की, तुम्हाला जुन्या स्केलप्रमाणे निवृत्ती वेतन मिळेल. सभापती महोदय, महालेखाकारांनी यांना असे कळविले आहे की, "I am, therefore, to request you to kindly issue necessary instructions in this regard." यामध्ये अडचण काही नाही. यांनी जी.आर. काढलेला आहे. त्यांच्याकडे देखील चूक झालेली होती. माननीय मंत्री महोदयांनी स्वत: लक्ष घालून 17 जानेवारी 2004 चा शासन निर्णय निर्गमित केला. त्याप्रमाणे सभागृहामध्ये सांगितले आणि त्याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन मिळू लागले. पण त्यांचे पेन्शन मात्र जुन्याच स्केल प्रमाणे निश्चित होते आहे. त्यामुळे ही सारी पेन्शनर मंडळी अत्यंत त्रस्त झालेली आहेत. आता खरे तर मी वेगळाच प्रश्न येथे विचारणार होतो. पण तो मी विचारीत नाही. मी असे विचारणार होतो की, वित्त विभागाचे जे काही व्हायचे असेल ते होऊ द्यात. पण जे तुम्ही केले आहे ते तरी तुम्ही त्यांना कळवा. पण आता ते पुढे गेलेले दिसते आहे. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, हे जे आहे, इंडियन ऑडिट ॲण्ड अकौंटस् डिपार्टमेंट, ऑफिस ऑफ द अकौंटट जनरल महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांनी आपल्याला पत्र लिहिले आहे. यांना आपण सुधारित प्रमाणे पेन्शन देण्याविषयी अधिसूचना किती तारखेला पाठविणार आहात >?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ए.जी.ला जी अधिसूचना पाठवावयाची आहे ती वित्त विभागाने पाठवावयाची आहे. वित्त विभागाने आमच्या विभागाला विनंती केली होती की, या संदर्भातील अधिसूचनेचे स्वरूप काय असायला पाहिजे ते तुम्ही आम्हाला कळवा. 20 मार्चला या संदर्भातील जीआर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढून वित्त विभागाला पाठविला आहे आणि वित्त विभागाकडून येत्या 15 दिवसात ही अधिसूचना ए.जी.कडे जाईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आतापर्यंत पाचवा वेतन आयोग सर्व कर्मचाऱ्यांना आपण दिला, सर्व शिक्षकांना देखील दिला. त्यासाठी 13 मे 1999ला आपण जीआर काढला. कोठेही अडथळा नाही. पण मग केवळ या निदेशकांच्या बाबतीतच ही अडचण का निर्माण झाली ? या बाबतीतील जे स्कूल ॲक्ट आहे किंवा नियम आहेत यामध्ये अमेंडमेंट न होता ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांना मी सांगू इच्छितो की, आपण आपला प्रश्न असेल तर तो विचारावा. आपल्याबाबतीत असे होते आहे की, दरवेळेस आपण प्रश्न विचारताना अन्य बाबी सांगत असता आणि त्यामध्येच अधिक वेळ जातो. हे बरोबर नाही. आपण डायरेक्ट प्रश्न विचारावा. कधी तरी आपण हा प्रयोग करून पहा ना.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, शालेय शिक्षण विभागाला आणि इतरांना हा अडथळा न येता या महालेखाकारांनी या निदेशकांनाच हा अडथळा का आणला ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भामध्ये जो आवश्यक जीआर काढायला पाहिजे होता तो जीआर उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून काढला गेला होता. परंतु वित्त विभागाकडून ए.जी.ला या बाबतीत स्पष्ट सूचना जायला पाहिजे होत्या. जे सेवेमध्ये आहेत त्यांच्या बाबतीत त्या सूचना पाठविल्या गेल्या पण जे निवृत्त झाले आहेत त्यांच्याबाबतीत कदाचित अनवधानाने त्या सूचना पाठविण्याचे राहून गेले असेल म्हणून या संदर्भातील जी चूक झालेली आहे ..

(यानंतर श्री. सरफरे .... यू 1 ..

अशुद्धीरित प्रत / प्रारूपीय नाही

श्री. दिलीप वळसे वाटील...

आणि म्हणून या संदर्भात आपण वारंवार जागृती दाखविल्यामुळे ही झालेली चूक दुरुस्त करता आली. त्या संदर्भात अधिसूचना काढल्यानंतर वित्त विभागाकडून महालेखाकार यांच्या कार्यालयाला विशिष्ट नमुन्यामध्ये कळविणे आवश्यक असते. त्या संदर्भात वित्त विभागाकडून तंत्र शिक्षण विभागाकडे विचारणा करण्यात आल्यानंतर वित्त विभागाला तसे कळविण्यात आले आहे. आणि म्हणून मी सभागृहाला आश्वासित केल्याप्रमाणे पुढील 15 दिवसामध्ये या संदर्भातील निर्णय मार्गी लागेल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, आपण हे मान्य कसे केले? 17 जानेवारी 2004 च्या जी.आर. मध्ये सुधारणा झाली परंतु महालेखाकार यांच्या कार्यालयाला ती सुधारणा कळविण्यात आली नाही. म्हणून माझा त्या संदर्भातील प्रश्न आहे. या गोष्टीला 2 वर्षे झाली असल्यामुळे ज्यांच्याकडून याबाबत दिरंगाई झाली आहे त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. महालेखाकार यांच्या कार्यालयाला ही सुधारणा वेळीच पाठविली गेली असती तर निवृत्ती वेतन धारकांना मनस्ताप सोसावा लागला नसता. तेव्हा याबाबत मंत्रिमहोदयांकडून खुलासा होत असतांना संबंधितांवर कारवाई होणे अपेक्षित आहे, ती कारवाई करण्यात येईल काय?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, मी या संदर्भात उत्तर दिले आहे. महालेखाकार यांच्या कार्यालयाला वित्त विभागाकडून सूचना गेल्या पाहिजेत. त्या संदर्भात वित्त विभागाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे माहिती मागितली होती. त्यानंतर 20 मार्चला जी.आर. काढण्यात आला असून सदरहू जी.आर.ची प्रत विभागाकडे पाठविण्यात आल्यानंतर व वित्त विभागाने महालेखाकार यांच्या कार्यालयाला तसे कळविल्यानंतर हा विषय संपतो.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, हा विषय संपतो असे सांगून मंत्रिमहोदयांनी हा विषय सोडून देणे परवडणारे नाही. याबाबतच्या सूचना कां दिल्या नाहीत? We are setting a bad precedent. झालेली चूक सोडून देवून ती मान्य करणे आपल्याला परवडणार नाही.

सभापती : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर ऐकल्यानंतर असे स्पष्ट होते की, तंत्र शिक्षण विभागामार्फत काढण्यात आलेल्या जी.आर. ची प्रत वित्त विभागाकडे पाठविल्यानंतर वित्त विभागामार्फत महालेखाकार यांच्या कार्यालयाला तसे कळविणे आवश्यक होते. It may be a slip of tongue म्हणा किंवा झालेली चूक म्हणा. अशी चूक पुन्हा घडू नये असे आपल्याला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : ही चूक भविष्यामध्ये त्यांच्याकडून होवू नये. परंतु आज त्यांच्याकडून जी चूक झाली आहे ती आपण मान्य करायला तयार नाही. it is a crime. याचा फटका अनेक लोकांना बसला आहे हे आपल्याला विसरुन चालणार नाही. म्हणून माझी विनंती आहे की, आपण हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे. या संदर्भात ज्यांनी सूचना पाठविली नाही त्यांच्यावर नियमाप्रमाणे ॲक्शन घेतली पाहिजे.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, अशी घटना पुन्हा होणार नाही यासाठी संबंधितांना स्पष्ट सूचना दिल्या जातील, आणि ही बाब कां घडली हेही तपासून पहाण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निवृत्त निदेशकांना सुधारीत वेतनश्रेणी देण्यासंदर्भातील प्रश्नाला मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, लवकरात लवकर त्याबाबत निर्णय घेण्यात येईल. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, अशाप्रकारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये काम करणाऱ्या निवृत्त झालेल्या निदेशकांची वेतन निश्चिती झाली नाही त्यामुळे त्यांना सुधारीत वेतनश्रेणीनुसार निवृत्ती वेतन मिळाले नाही अशा महाराष्ट्रातील निदेशकांची संख्या किती आहे?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजा भद्रावती, जि.चंद्रपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाला मान्यता देण्याबाबत

(४) * १५७२४ श्री. धोंडीराम राठोड , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. धनाजी साठे , श्री. नतिकोद्दीन खतिब , श्री. यशवंतराव गडाख , श्री. सुधाकर गणगणे : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा भद्रावती, जि.चंद्रपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाला मान्यता देण्याबाबत मा.तंत्रशिक्षण मंत्री यांना दिनांक २२ जुलै, २००५ रोजी व त्यापूर्वीही वारंवार, स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील इमारतीचे बांधकाम होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरीता : (१) होय.

(२) व (३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची स्थापना व त्यांची बांधकामे ही जिल्हास्तरीय योजना असून याकरिता जिल्हा नियोजन व विकास समितीकडून आवश्यक नियत व्यय उपलब्ध होणे गरजेचे आहे.

सदर संस्थेच्या इमारत बांधकामासाठी रु. ९४,४४,५२३/- इतक्या अंदाजित खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे.

त्याप्रमाणे जिल्हा नियोजन व विकास समिती, चंद्रपूर यांनी सन २००४-०५ मध्ये या योजनेकरिता रु. २८.६८ लाख इतका नियत व्यय उपलब्ध करुन दिला होता. त्यापैकी ५५ टक्के कोअर वजा जाता प्रत्यक्ष रु. १५.७७ लाख इतका नियत व्यय उपलब्ध झाला होता. सदरचा उपलब्ध नियत व्यय जिल्ह्यातील कोरपना येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या चालू बांधकामासाठी अर्थसंकल्पित करण्यात आला होता.

तर सन २००५-०६ करिता काहीही नियत व्यय उपलब्ध होऊ शकला नाही.

सन २००६-०७ करिता जिल्हा नियोजन व विकास समितीकडून उपलब्ध करुन दिलेल्या नियत व्ययानुसार रु. २०.९० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, व्यवसायामधून तंत्र शिक्षण देण्याची नितांत गरज आहे. ही बाब शासनाने मान्य करुन त्या करीता इमारत बांधण्यासाठी 2004-05 मध्ये रु.28.68 लाख इतका निधी उपलब्ध करुन दिला. त्यापैकी 55 टक्के कोअर वजा जाता प्रत्यक्ष रु.15.77 लाख इतका निधी मिळाला. बाकीचा निधी मिळाला नाही. पुढील वर्षीच्या आर्थिक तरतूदीमध्ये याचा समावेश आहे की नाही? इतका कमी निधी उपलब्ध करुन दिला तर ही इमारत केव्हां पूर्ण होईल? त्याबाबत निश्चित कालावधी आपण सांगणार काय? ही इमारत बांधल्याशिवाय औद्योगिक प्रशिक्षणाचा प्रश्न सुटणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15724 (पुढे सुरु.....

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, तंत्र शिक्षण शाळा किंवा आय.टी.आय. यांचे बांधकाम करावयाची योजना ही मुळामध्ये जिल्हा स्तरावरील आहे. जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून आय.टी.आय. किंवा तंत्र शाळांच्या बांधकामासाठी, इक्वीपमेंट अपग्रेड करण्यासाठी हा निधी उपलब्ध करुन दिला जातो. म्हणून या संदर्भामध्ये सातत्याने जिल्हा नियोजन मंडळांनी सर्व राज्यामध्ये असलेल्या आय.टी.आय.ना किंवा तंत्र शिक्षण शाळांसाठी निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे, अशाप्रकारची अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त करत असतो. सभापती महोदय, मी या विभागाचा चार्ज घेतल्यानंतर राज्यातील सर्व पालक मंत्र्यांना व जिल्हाधिकाऱ्यांना विनंतीवजा पत्र लिहिलेले होते. आज मी सभागृहामध्ये सांगू इच्छितो की,राज्यामध्ये एकूण 347 आय.टी.आय.ची संख्या असली आणि 6 आयटीआयच्या संदर्भात भूसंपादन झालेले असले तरी 2000 सालापर्यन्त फक्त 97 आय.टी.आय.च्या इमारतींची बांधकामे झालेली होती. आपण यामध्ये इनिशिएटिव धेतल्यानंतर 2000 सालापर्यन्त 38 आयटीआयच्या इमारतीची बांधकामे पूर्ण झाली आणि 74 आय.टी.आय.ची बांधकामे सुरु आहेत आणि 2006-07 मध्ये 55 आय.टी.आय.ची होतील. म्हणजे 167 आयटीआय इमारतींची बांधकामे गेल्या दोन-तीन वर्षामध्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न झालेला आहे. म्हणून राज्य सरकारने प्रत्येक तालुक्यामध्ये आय.टी.आय. करण्याची भूमिका घेतली तरी जमीन प्राप्त करण्यापासून, टाईप प्लॅन तयार करण्यापर्यन्त, निधी उपलब्ध करुन देण्यापर्यन्त या सर्व बाबींवर विभागाच्या वतीने वेळोवेळी लक्ष ठेवण्यात येते. जिल्हाधिकाऱ्यांच्या बरोबर संबंधित पालक मंत्री महोदयांना विनंती करण्यात येते की, आय.टी.आय.च्या बांधकामासाठी पैसे उपलब्ध करुन दिले पाहिजे. त्याप्रमाणे आय.टी.आय.ला निधी उपलब्ध झाल्यानंतर विहीत वेळेमध्ये त्यांचे काम पूर्ण होईल.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, हा प्रश्न मौजे भद्रावती, जि.चंद्रपूर येथील आय.टी.आय.च्या इमारतीच्या बांधकामासंदर्भात विचारलेला आहे. परंतु सभापती महोदय,उत्तर देत असतांना, "28.68 लाख इतका नियतव्यय उपलब्ध करुन दिला होता, त्यापैकी 55 टक्के कोअर वजा जाता प्रत्यक्ष रु.15.77 लाख इतका नियतव्यय उपलब्ध झाला होता. सदरचा उपलब्ध नियतव्यय जिल्ह्यातील कोरपना येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या चालू बांधकामासाठी अर्थसंकल्पित करण्यात आला होता." असे म्हटलेले आहे. मग हे भद्रावती येथील आय.टी.आय.चे बांधकाम कधी सुरु होणार आणि त्यासाठी निधी कधी उपलब्ध होणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ज्यावेळेला अशाप्रकारचा निधी जिल्हा नियोजन मंडळामध्ये उपलब्ध केला जातो, तेव्हा तो "कामगार कल्याण" या हेडखाली उपलब्ध करुन दिला जातो. साधरणपणे जिल्हयाचे नियोजन मंडळ हे त्या त्या जिल्ह्यामधील आय.टी.आय. संस्थांची परिस्थिती लक्षात घेऊन निधी वर्ग करुन दिला जातो. एखाद्या वेळेला एखाद्या संस्थेला निधी मंजूर असतो, पण काही कारणामुळे टेंडर मंजूर झाले नाही, प्रशासकीय मान्यता मिळाली नाही, जागा मिळाली नाही किंवा कोर्टाचे काही अडथळे आले तर तो निधी बाजूच्या आय.टी.आय.ला उपलब्ध करुन दिला जातो. म्हणून मी सभागृहामध्ये सांगितलेले आहे की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जेवढी म्हणून आय.टी.आय. आहेत या सगळया आय.टी.आय.ना जमीन मिळविण्यापासून ते बांधकाम करण्यापर्यन्त बारकाईने लक्ष ठेवून कोणत्याही परिस्थितीमध्ये आय.टी.आय.च्या इमारतींचे बांधकाम उद्याच्या वर्षभरामध्ये पूर्ण करुन घेण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न राहील.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले की, अनेक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची बांधकामे सुरु आहेत. ही बांधकामे सुरु आहेत, हे खरे आहे परंतु ती पूर्ण कधी होणार आहेत ? ती बांधकामे पूर्ण होण्यासाठी शासन कोणत्या प्रकारची उपाययोजना करते आहे ? जिल्हा नियोजन मंडळाने तरतूद करावी म्हणजे त्यांचे बांधकाम पूर्ण होईल, या अपेक्षेवर आपण राहिलो तर नजिकच्या काळामध्ये ही बांधकामे पूर्ण होणार नाहीत. म्हणून माझी विनंती आहे की, किमानपक्षी जी बांधकामे सुरु आहेत ती पूर्ण झाली पाहिजेत, यासाठी शासन कोणती योजना आखणार आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आजच्या तारखेला तरी आय.टी.आय.चे बांधकाम ही जिल्हा स्तरावरील योजना आहे,ती राज्य स्तरावरील योजना नाही. विधानसभेचे सदस्य आणि विधान परिषदेचे सदस्य हे डी.पी.डी.सी.चे सदस्य असतात. त्याप्रमाणे जिल्हाधिका-यांना आणि पालकमंत्र्यांना जशी विनंती केलेली आहे, तशी सर्व विधानसभेच्या आणि विधानपरिषदेच्या सदस्यांनाही विनंती करतो की, ज्यावेळेला डी.पी.डी.सी.ची मिटिंग ज्यावेळेला असेल, किंवा स्मॉल ग्रुपची मिटिंग ज्यावेळेला असेल, त्यावेळेला आय.टी.आय.च्या बांधकामासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशाप्रकारचा आग्रह डी.पी.डी.मध्ये धरला तर हे काम लवकरात लवकर करता येईल.

यानंतर श्री.बरवड....

अशुद्धित प्रत / शोधनासाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ही राज्यस्तरीय योजना आहे आणि राज्यसरकार मॉनिटरींगचे काम करीत आहे. एखाद्या इमारतीचे 95 लाख रुपयाचे काम असले तरी इमारत बांधकामाशिवाय मशिनरी, जागा, विद्युतीकरणाचा खर्च हे सर्व मिळून दीड ते पावणेदोन कोटी रुपयांचा प्रकल्प असेल आणि तो प्रकल्प या पध्दतीने पूर्ण होणार असेल तर त्याचे बांधकाम, त्याचा दर्जा, त्याबाबत होणारी हेळसांड पाहता राज्य सरकारने यामध्ये पुढाकार घेऊन राज्यसरकार आणि डीपीडीसीचा पूल तयार करुन, वेगळ्या पध्दतीने नियोजन करुन चांगल्या पध्दतीने ही कामे पूर्ण करणे, त्यासाठी फायनान्स उभा करणे अशा पध्दतीने या 167 आय.टी.आय.ची कामे पूर्ण होतील अशी योजना आखणार काय ? त्यासाठी सर्व सबंधित आमदारांना तंत्रशिक्षण विभाग कम्युनिकेट करणार काय ? यासंदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. राज्य स्तरावर काही योजना करणार काय ? संबंधित आमदारांना आपण स्वत: कम्युनिकेट करणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, इमारतीच्या बांधकामाची योजना राज्य स्तरावर घेण्याचा प्रस्ताव आज तरी राज्य सरकारच्यासमोर नाही. तरी सुध्दा मशिनरीच्या आणि इक्विपमेंट्सच्या बाबतीत जो निधी लागतो, जो मागास भाग आहे त्या ठिकाणी जो अनुशेष आहे त्या ठिकाणी या कामासाठी राज्य सरकार राज्य स्तरावरील बजेटमध्ये अनुशेषाच्या अंतर्गत मशिनरी आणि इक्विपमेंटसाठी पैसे देत असते. इमारतीच्या बांधकामासाठी डीपीडीसीने पैसे उपलब्ध करुन दिले पाहिजेत याबाबत विभागाच्या वतीने सातत्याने त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांकडे, नियोजन विभागाकडे पाठपुरावा करीत आहोत. मी सांगितले की, सन 2000 पर्यंत 97 आय.टी.आय.ची बांधकामे पूर्ण झाली. गेल्या अडीच ते तीन वर्षामध्ये 167 आय.टी.आय.ची कामे घेतलेली आहेत. दोन वर्षात सर्व आय.टी.आय.ला स्वत:च्या मालकीची इमारत असण्याच्या संदर्भात पाठपुरावा करुन ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. जर त्या ठिकाणी यश आले नाही तर आपल्याला पर्यायी विचार करता येईल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, तंत्रशिक्षणाच्या बाबतीत असलेला आराखडा माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितलेला अहे. जी माहिती दिलेली आहे त्यामध्ये कशी विसंगती आहे हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 15724 ..... श्री. सुधाकर गणगणे ...

मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. माझ्या आकोट तालुक्यामध्ये पॉलिटेक्निक करिता शासनाची मान्यता मिळूनही, जागा उपलब्ध होऊनही जवळजवळ चार वर्षापासून हा प्रकल्प प्रलंबित आहे. तंत्रशिक्षणाचा हा प्रकल्प कोणत्या कारणासाठी प्रलंबित आहे आणि त्याकरिता शासन प्रशासकीय मान्यता केव्हा देणार आहे ? याबाबत शासन खुलासा करील काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी विचारलेला प्रश्न हा व्यवसाय शिक्षणाशी संबंधित आहे. तंत्रशिक्षणाशी संबंधित वेगळा प्रश्न विचारण्याची संधी सन्माननीय सदस्यांना बजेटनंतर मिळणार आहे. त्यावेळी उत्तर देऊ.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ MHM/ SBT/ KGS

मुंबई परळ येथील महात्मा गांधी रुग्णालयाची दुरावस्था

(5) * 13131 श्री. मधुकर चव्हाण , डॉ. अशोक मोडक , श्री. विनोद तावडे , श्रीमती कांता नलावडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील परळ येथील गिरणी भागातील महात्मा गांधी रुग्णालय हे फक्त कामगारांसाठीच असल्याने तेथे सामान्य रुग्णांना प्रवेश दिला जात नाही हे खरे आहे काय,

(2) असल्यास, गिरण्या सुरु असताना अकराशेच्या घरात असणारी रुग्णांची संख्या आता 180 वर आली असून आता रुग्णालय बंद पडण्याच्या मार्गावर आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या रुग्णालयातील एक एक विभाग डॉक्टरांअभावी तसेच रुग्णांअभावी बंद करण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(4) असल्यास, हे रुग्णालय पुनर्जिवीत करण्यासाठी शासन सामान्य रुग्णांनासुद्धा प्रवेश मिळावा याकरीता रुग्णालयाच्या नियमात बदल करणार आहे काय, वा त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता : (1) होय.

(2) हे खरे नाही.

(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, जवळपास 700 खाटा असलेल्या महात्मा गांधी रुग्णालयामध्ये गिरण्या बंद पडल्यामुळे 1999 पासून 330 खाटा होत्या. हे रुग्णालय सर्वसाधारण रुग्णालय व्हावे यासाठी मे, 2004 मध्ये त्यांच्या डायरेक्टर बोर्डाची बैठक झाली. कै. वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री असताना हे इएसआयएस हॉस्पिटल चालू केले गेले. महाराष्ट्र शासन, राज्य कामगार विमा महामंडळ आणि मिल ओनर्स असोसिएशन एकत्र आले आणि त्या काळात हे रुग्णालय सुरु केले. परंतु मिल बंद पडल्यामुळे आज हे रुग्णालय अतिशय वाईट अवस्थेमध्ये आहे. त्या ठिकाणी 330 खाटा असल्या तरी सुध्दा त्या ठिकाणी 160 रुग्ण आहेत. त्या ठिकाणी आर.एम.ओ. तसेच रजिस्ट्रार राहावयास मागत नाहीत. त्या ठिकाणी 330 खाटा आहेत हे खरे आहे काय ? मे, 2004 मध्ये डायरेक्टर बोर्डाची बैठक झाली. हे रुग्णालय सर्वसाधारण रुग्णालय करावे, जे.जे.हॉस्पिटल किंवा सेंट जॉर्जेस हॉस्पिटलसारखे रुग्णालय करावे अशी मागणी आहे. ते केव्हा करण्यात येणार आहे ? यासाठी किती कालावधी लागणार आहे. शासनाचे याबाबतीत काय धोरण आहे ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, आज त्या ठिकाणी 330 खाटा आहेत. हे ई.एस.आय.एस. हॉस्पिटल आहे. आज त्या ठिकाणी रुग्ण कमी आहेत. हे हॉस्पिटल जे.जे. हॉस्पिटलप्रमाणे जनरल हॉस्पिटल व्हावे यासंदर्भात बोर्ड ऑफ मॅनेजमेंटकडे ठराव गेलेला आहे. कमिशनर ई.एस.आय.एस., रिजनल डायरेक्टर, सेक्रेटरी, मिल ओनर्स असोसिएशन आणि मेडिकल सुपरिण्टेण्डेण्ट एम.जी.एम. हॉस्पिटल यांनी ठराव केलेला आहे. ह्या हॉस्पिटलच्या बाबतीत ट्रस्ट डीड झालेली आहे. त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. हा प्रस्ताव बोर्ड ऑफ मॅनेजमेंटला दिलेला आहे असून तो प्रलंबित आहे. त्यांच्याकडून हा प्रस्ताव आल्यानंतर तो कमिशनर यांच्याकडे पाठवावा लागेल. त्यानंतर तो प्रस्ताव शासनाकडे येईल आणि त्यानंतर तो प्रस्ताव डायरेक्टर जनरल, ई.एस.आय.एस. यांच्याकडे पाठवावा लागेल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, आता मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर हे आधीच छापील स्वरुपामध्ये दिले असते तर अधिक बरे झाले असते. प्रश्न क्रमांक 3 आणि 4 ला "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे. मी माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचे अभिनंदन करतो. तेथील सगळया गिरणगावाचे वळण बदलले असून त्यानुषंगाने हा प्रश्न त्यांनी येथे उपस्थित केलेला आहे. मूलभूत प्रश्न असा आहे की, आता माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर आधीच छापील स्वरुपामध्ये का दिले नाही ? हा प्रश्न चर्चेला आला नसता तर याबाबतीत पुढे काहीच झाले नसते. तेव्हा याबाबतीत आपण काय ॲक्शन घेणार आहात ?

डॉ. विमल मुंदडा : माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने पूर्ण माहिती दिलेली आहे. हा पॉलिसी मॅटरचा प्रश्न आहे. ट्रस्ट डीडमध्ये बदल करुन घ्यावा लागणार आहे. ई.एस.आय.एस., सार्वजनिक आरोग्य विभाग यांची याबाबतीत 18.5.2005 ला मिटींग झाली. याबाबतीत धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे. इन्स्युरन्स पेशण्ट व्यतिरिक्त अन्य सर्वसामान्य रुग्णांना देखील या हॉस्पिटलमध्ये उपचार घेता यावेत यादृष्टीने हे जनरल हॉस्पिटल होण्यासाठी शासन लवकरात लवकर धोरणात्मक निर्णय घेणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.13131....)

श्रीमती कांता नलावडे : दिलेले उत्तर संदिग्ध आहे. हे हॉस्पिटल कामगारांसाठी आहे. 700 खाटा असलेल्या या हॉस्पिटलमध्ये आता 330 खाटा आहेत. पूर्वी या हॉस्पिटलमध्ये 25 वॉर्डस् होते, ती संख्या आता 5-7वर आलेली आहे. लहान मुलांच्या विभागामध्ये प्रसुती विभाग सुरु केलेला आहे. अर्थोपेडिक्सचे 2 वार्डस् आहेत. या हॉस्पिटलमध्ये जास्त रुग्ण आले तर त्यांना जे.जे.हॉस्पिटल किंवा के.ई.एम.हॉस्पिटलमध्ये पाठवले जाते. अशी सर्व परिस्थिती असताना छापील उत्तरामध्ये प्रश्न उद्भवत नाही असे उत्तर कसे काय देण्यात आले ?

श्री. रणजित कांबळे : ई.एस.आय.एस., राज्य शासन आणि मिल ओनर्स् असोसिएशन यांची ट्रायपार्टी ट्रस्ट डीड आहे. हे हॉस्पिटल केवळ कामगारांसाठी आहे. हे हॉस्पिटल जनरल हॉस्पिटल करण्यासाठी ट्रस्ट डीडमध्ये बदल करणे आवश्यक आहे. मागील मिटींगमध्ये ट्रस्ट डीडमध्ये बदल करुन प्रस्ताव बोर्ड ऑफ मॅनेजमेंटकडे पाठविलेला आहे. त्यांच्याकडून हा प्रस्ताव आल्यानंतर शासन त्यावर निर्णय घेईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : छापील उत्तरामध्ये प्रश्न क्रमांक 3 आणि 4 ला "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी सामान्य रुग्णालय करण्याच्या संदर्भात मिटींग झाल्याचे सांगितले. हेच उत्तर आधी छापील स्वरुपामध्ये दिले असते तर बरे झाले असते. मिटींग केव्हा झाली ?

श्री. रणजित कांबळे : 18.5.2005ला मिटींग झाली.

श्री. पांडुरंग फुंडकर : ही माहिती लेखी उत्तरामध्ये यावयास पाहिजे होती.

...नंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्र नाही

ता.प्र.क्र. 13131 पुढे सुरु...

सभापती : याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यावर उत्तर बरोबर दिले. परंतु लेखी प्रश्न विचारला होता त्या अनुषंगाने अगोदरच छापील उत्तरामध्ये ही माहिती यावयास पाहिजे होती. यापुढील काळात योग्य पध्दतीने छापील उत्तर दिले तर त्याचा फायदा होणार आहे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, पुढील काळात निश्चितपणाने छापील उत्तरे देताना दक्षता घेतली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, परळ येथील महात्मा गांधी रुग्णालय हे केईएम रुग्णालयापासून फक्त 1 कि.मी.अंतरावर आहे. या विषयावरील प्रश्न मी 1999 मध्ये देखील विचारला होता. रुग्णालयाच्या ट्रस्टींमध्ये राज्य शासन,इएसआय आणि असोसिएशनचे लोक आहेत. ट्रस्टीजबरोबर 2004,2005 मध्ये बैठका झाल्या. आज आपण 2006 मध्ये आहोत. कायद्यामध्ये अमेंडमेंड करावी लागेल हे आम्हांला मान्य आहे. परंतु प्रश्न असा आहे की, शासनाला स्वत:ला या रुग्णालयामध्ये सुधारणा करावी असे वाटते काय ? टाटा हॉस्पीटलमधील रुग्णांना रस्त्यावर रहावे लागत आहे. टाटा हॉस्पीटल हे रुग्णालय चालविण्यासाठी विचारणा करीत आहेत त्यांना शासन हे रुग्णालय चालविण्यासाठी देईल काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, ट्रस्टींबरोबर लवकरात लवकर बैठक बोलावून याबाबतीत किती दिवसात निर्णय घेतला जाईल ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या हॉस्पीटलला अर्थपुरवठा शासनाकडून केला जातो. या रुग्णालयाचे जे बोर्ड आहे त्याचे अध्यक्ष डायरेक्टर,इएसआय आहेत. त्यांना आपण याबाबतीत विनंती करु शकतो. शासनाचाही पाठपुरावा सुरु आहे. दोन महिन्यांअगोदर समिती आली होती. शासनाने प्रस्ताव दिलेला आहे. या हॉस्पीटलचे जनरल हॉस्पीटल करावयाच्या दृष्टीने पाठपुरावा सुरु आहे. निर्णय केंद शासनाने घ्यावयाचा आहे. अंतिम प्रस्ताव डायरेक्टरांकडे जातो आणि त्यानंतर कामगार मंत्रालयापर्यंत प्रस्ताव जातो. राज्य शासनाकडून याबाबतीत पाठपुरावा सुरुच आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 2004 मध्ये ट्रस्टींबरोबर बैठक झाली. एकमताने निर्णय घेतला गेला. 2005 मध्ये बैठक झालेली आहे. मध्यंतरीच्या काळात पाठपुरावा केला म्हणजे नेमके कोणते प्रयत्न केले ? केवळ पत्र पाठविले किंवा चर्चा केली ? बाजूलाच असलेल्या केईएम रुग्णालयात जागा नाही. पेशंट रस्त्यावर झोपत आहेत. रुग्णालय बंद पडण्याच्या स्थितीत आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 12:40

ता.प्र.क्र. 13131 पुढे सुरु...

श्री.विनोद तावडे...

आम्ही जर प्रश्न विचारला नसता तर हा सर्व प्रस्ताव थंडबस्त्यात पडला असता. शासनाने एकमताने आणि ट्रस्टींनी एकमताने निर्णय धेतल्यावर कोणते विशेष प्रयत्न करण्यात आले ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मागील दोन महिन्यापूर्वी टीम आली होती. त्यांच्याबरोबर मा.मंत्री महोदय आणि मी स्वत: जाऊन चर्चा केली होती. आयुक्तांना विनंती केली की तुम्ही स्वत: येऊन इमारतीची पाहणी करा. चेअरमन दिल्लीचे आहेत. शासन पाठपुरावा करीतच आहे. मंत्रीमहोदय स्वत: भेटून त्यांच्याशी बोलले आहेत.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 13131.....

श्री. विनोद तावडे : महोदय, यासंदर्भात शासनाकडून कोणता पाठपुरवा केला आहे ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, शासनाचा उद्देश अगदी स्पष्ट आहे की हे हॉस्पीटल जनरल स्वरुपाचे सुरु व्हावे व त्यासंदर्भात वारंवार प्रयत्न चालू आहेत. जेवढया लवकर हे शक्य होईल तेवढया लवकर हे हॉस्पीटल इतर लोकांसाठी सुरु करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, माननीय मंत्री महोदयांना माझा एकच प्रश्न आहे की, या ट्रस्ट डीडमध्ये असा नियम आहे की 6 ट्रस्टीजनी एकमताने ठराव केला पाहिजे आणि तो मे 2004 मध्ये करण्यात आला आहे. त्यानंतर आता कुठलीच तांत्रिक अडचण राहिलेली नाही. मध्यंतरी श्री. दुवा आणि श्री. नवीनकुमार होते त्यांची बदली झाल्यानंतर तेथे कोणी तरी नवीन येतील. बाजूलाच के.ई.एम. रुग्णालय आहे व त्या ठिकाणी पेशंट्सना जागा कमी पडते इतकी भयानक परिस्थिती आहे. म्हणून एक महिन्याच्या आत हे रुग्णालय सर्वसाधारण रुग्णालय म्हणून करण्यात येईल काय ? आणि शासनाच्या सेंट जॉर्जेस आणि जे.जे. हॉस्पीटलला ॲफिलिएटेड करण्यात येणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, सजेशन फॉर ॲक्शन परंतु हे हॉस्पीटल शासनच चालविणार हे देखील मी सांगू इच्छितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पिंपळघर-रांजणोली (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील महिला सरपंच

यांना देण्यात आलेली अवमानकारक वागणूक

(6) * 15963 श्री. प्रतापराव सोनवणे,श्री. गुरुमुख जगवानी,श्री. श्रीकांत जोशी , श्री. शांताराम करमळकर , श्री. जगदिश गुप्ता , श्रीमती कांता नलावडे : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जिल्हा ठाणे. ता.भिवंडी येथील ग्रामपंचायत पिंपळघर-रांजणोली, भिवंडी येथील महिला ओबीसी सरपंच श्रीमती द्रोपदी म्हात्रे यांना तेथील ग्रामसेवक श्री. बोरसे, पंचायत समिती अधिकारी, श्री.व्ही.के जाधव तसेच विस्तार अधिकारी प्रशासक श्री. वईरुडे हे असहकार व अवमानकारक वागणूक वारंवार देत असल्याची लेखी तक्रार तेथील नागरीकांनी, लोकप्रतिनीधी व सरपंच यांनी दिनांक 10 जानेवारी, 2006 रोजी वा त्या सुमारास मा. ग्रामविकास मंत्री यांच्याकडे केली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(3) अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(4) चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

श्री. रणजित कांबळे, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता : (1) होय. ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती द्रोपदी म्हात्रे, यांनी दिनांक 2 जानेवारी,2006 रोजी लेखी तक्रार पंचायत समिती, भिवंडी कार्यालयाकडे केलेली आहे. तसेच श्री. म.ना. बरोरा, विधानसभा सदस्य, यांचे दिनांक 13 जानेवारी,2006 चे निवेदन शासनाकडे प्राप्त झालेले आहे.

(2) शासनाकडे प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना दिनांक 20 फेब्रुवारी,2006 रोजी देण्यात आलेले आहेत.

(3) व (4) गट विकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावार त्यांनी केलेल्या चौकशीत असे आढळून आले आहे की, सरपंच श्रीमती द्रोपदी म्हात्रे ह्यांचे पती श्री. वसंत म्हात्रे हे रेल्वे कर्मचारी असून ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत हजर राहून ग्रामपंचायतकडे आलेल्या अर्जांवर शेरे मारणे, सरपंचाचे पत्रव्यवहारावर सरपंचाचे प्रतिनिधी म्हणून अभिप्राय, देणे असे बेकायदेशीर कृत्य करुन ग्रामपंचायतीच्या कारभारात

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हस्तक्षेप करतात. सरपंच, ग्रामपंचायत पिपळघर-रांजणोली यांना व वसंत म्हात्रे यांना याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांनी समज दिली आहे. तथापि, याबाबत सखोल चौकशी करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, यांना देण्यात आलेले आहेत. चौकशीअंती जे दोषी आढळतील त्यांच्या विरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री. प्रतापराव सोनवणे : महोदय, पिंपळघर-राजणोली ग्रामपंचायतीचे सरपंच, विस्तार अधिकारी आणि पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांविरुध्द सरपंच, स्थानिक आमदार व नागरिकांनी तक्रार केलेली आहे. या तक्रारीची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे हे कधी पूर्ण करणार आहेत ? तसेच या महिला सरपंचांना ग्रामांचायतीचे नियमित कामकाज करतांना अडचणी येऊ नयेत म्हणून त्यांना कोणत्या प्रकारचे संरक्षण शासनाने दिलेले आहे ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, हे खरे आहे की, स्थनिक आमदारांनी सरपंचांच्या विरोधात 13.2.2006 रोजी माननीय मंत्री महोदयांकडे तक्रार केली होती. माननीय मंत्री महोदयांनी 20.2.2006 रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याबाबत चौकशी करावी असे पत्र त्यांच्याकडे पाठविले असून सध्या चौकशी सुरु आहे. तसेच यापूर्वी ऑलरेडी तीन तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यातील पहिली तक्रार अशी आहे की, ग्रामपंचायतीचे सदस्य श्री. विनोद ठाकूर यांच्याविरुध्द जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार झालेली आहे. त्या तक्रारीमध्ये त्यांना तिसरे अपत्य असल्याचे म्हटले आहे. तसेच सरपंच सौ. द्रौपदी म्हात्रे यांच्या पतींनी ग्रामसेवकाला कोंडून त्यांच्याकडून जबरदस्तीने ठराव लिहून घेतला अशी देखील एक तक्रार होती. सौ. द्रौपदी म्हात्रे हया 19.4.2005 रोजी सरपंच झाल्या आणि त्यावेळपासून श्री. व्ही.के.जाधव, आर.के. बोरसे आणि श्री. एन.सी.कोळी असे तीन ग्रामसेवक बदलले आहेत कारण त्यांच्या विरोधातही तक्रारी आहेत. म्हणून शासनाने या सगळया तक्रारींची चौकशी करुन अहवाल पाठविण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : महोदय, 45 दिवस अगोदरपासून तारांकित प्रश्न विचारलेला आहे. त्यानंतर 13 जानेवारी रोजी अशा स्वरुपाची तक्रार केली आणि माननीय मंत्री महोदयांनी सुध्दा तसे आदेश 20 फेब्रुवारी रोजी दिलेले आहेत. तरी देखील चौकशी चालू असल्याचे सांगण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13131..... श्री. श्रीकांत जोशी .....

येते. मग यामध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी 20 मार्चपर्यंत देखील चौकशी केलेली नाही हे खरे आहे काय ? तसेच यामध्ये प्रशासकीय यंत्रणा दोषी आहे की सरपंच दोषी आहेत याबद्दल शासनाचे नेमके मत काय आहे ?

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15963...

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सरपचांविरूध्द तक्रार करण्यात आल्यामुळे गटविकास अधिकारी यांनी स्वत:चौकशी केलेली आहे, तर त्यांच्या विरूध्द सरपंचांनेसुध्दा तक्रार केलेली आहे. त्यामुळे या दोन्ही तक्रारीच्या संदर्भात उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील हे एकच उदाहरण आहे असे नाही. आज ग्रामीण भागातील महिला सरपंच व उपसरपंच यांना नीटपणे काम करू दिले जात नाही. येथे जे महिला सरपंचाच्या पतीचे जे कारण सांगितले आहे, ते खरे नाही. त्यामुळे गटविकास अधिकारी यांनी जी चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले आहे ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, गटविकास अधिकारी यांनी केलेल्या चौकशीमध्ये महिला सरपंच श्रीमती द्रौपदी म्हात्रे यांचे पती मासिक सभेमध्ये बसले होते, त्यांनी स्वत: शेरे मारले आहेत, असे आढळून आले आहे. एवढेच नव्हे तर महिला सरपंचाच्या पतीला याबाबत यापूर्वीही ताकीद देण्यात आली होती. त्यासंबंधीचा अहवाल देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, श्रीमती कविता महाजन यांचे 'ब्र' नावाचे पुस्तक आहे. त्याची मला या निमित्ताने आठवण होते. महिला सरपंच सौ.द्रौपदी म्हात्रे यांचे पती आपल्या पत्नीला साईड ट्रॅक करून, बॅक सीटवर बसवून ड्रायव्हींग करीत आहेत. खऱ्या अर्थाने येथे 2-3 पुरूष अधिकारी असल्यामुळे तेच कारभार करीत आहेत. महिला सरपंच यांचा अवमान करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर त्यांना असहाकार्य देखील केले आहे. त्यांचा अवमान केला हे मला मान्य आहे. पण असहकार हा विषय फार गंभीर आहे. महिलांना सहकार्य देण्यात येत नाही असे वातावरण महाराष्ट्रामध्ये उभे राहील. तेव्हा या प्रकरणाची तातडीने चौकशी करून जे दोषी असतील त्यांना शिक्षा करण्यासाठी शासन डेड लाईन जाहीर करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे म्हणून चौकशीसाठी वेळ देण्यात येत आहे. आज महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारामध्ये नीट काम करू दिले जात नाही. या प्रकरणात सौ.म्हात्रे यांचा पती ग्रामपंचायतीच्या कार्यालयात बसत होता. त्यांनी ग्रामसेवकाला मारले होते. याबाबत पोलीस ठाण्यामध्ये देखील तक्रार दाखल करण्यात आली होती. महिला सरपंच सौ.म्हात्रे यांच्या पतीविरूध्द सगळी कायदेशीर कारवाई केलेली आहे. तरी देखील तीन महिन्याच्या आत चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात महिला लोकप्रतिनिधींना इतर पुरूष पदाधिकारी व पुरुष अधिकारी अवमानकारक वागणूक देत असतात. इतकेच नव्हे तर त्यांना कामसुध्दा करू देत नाहीत. 26 जानेवारी व 15 ऑगस्ट या दिवशी महिलांना तर झेंडावंदन देखील करू दिले जात नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, महिला सरपंचांनी जी तक्रार केली आहे, तिचे नेमके स्वरूप काय आहे ? तसेच, माननीय आमदारांनी जे निवेदन दिलेले आहे, त्यात काय म्हटले आहे ?

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15963...

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जी तक्रार करण्यात आली होती ती गट विकास अधिकारी यांच्याकडे करण्यात आली होती. माझ्याकडे कोणतीही तक्रार करण्यात आली नव्हती. त्यामुळे गट विकास अधिकारी यांच्याकडे करण्यात आलेल्या तक्रारीचा आधार घेऊन सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.महादू बरोरा यांनी शासनाकडे निवेदन सादर केले होते. त्यामध्ये त्यांनी नमूद केले होते की, तेथील महिला सरपंचाला कामकाज करु दिले जात नाही. तसेच ग्रामसेवकाची वागणूक देखील योग्य प्रकारची नसल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले होते.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, ग्रामसेवक व महिला सरपंचासंदर्भातील हा प्रश्न आहे. माननीय विधानसभा सदस्य श्री.महादू बरोरा यांनी सुध्दा या संदर्भात शासनाला निवेदन दिले होते. परंतु पंचायती राज व्यवस्थेमध्ये असे प्रश्न उद्‌भवू नयेत असे मला वाटते. मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, श्री.आबासाहेब खेडेकर जेव्हा ग्रामविकास मंत्री होते त्यावेळी एका ग्रामपंचायतीच्या संदर्भात सुध्दा अशाच प्रकारचा इश्यू निर्माण झाला होता. त्यावेळी मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी ग्रामविकास मंत्र्यांनी ज्या ग्रामपंचायतीबाबत प्रश्न निर्माण झाला होता त्या ग्रामपंचायतीचे स्पॉट व्हेरिफिकेशन केले आणि तो प्रश्न सोडविला. सध्या सदनासमोर ज्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे त्यासंदर्भात असे उत्तर देण्यात आले आहे की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणी चौकशी करीत आहेत, गट विकास अधिकारी चौकशी करीत आहेत. परंतु माझी या प्रश्नाच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, ज्याप्रकारे तत्कालीन ग्रामविकास मंत्र्यांनी ग्रामपंचायतीचे स्पॉट व्हेरिफिकेशन करुन, प्रश्न निकाली काढला होता, तशाच प्रकारचे स्पॉट व्हेरिफिकेशन विद्यमान ग्रामविकास मंत्र्यांनी केले तर अधिकारी आणि पदाधिकारी यांच्यामधील गैरसमज दूर होतील. त्यामुळे अशा प्रकारचे स्पॉट व्हेरिफिकेशन माननीय मंत्री महोदयांकडून होणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : महोदय, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून तीन महिन्यात चौकशी अहवाल मागवून, जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या प्रश्नाच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. पिंपळघर-रांजणोली, भिवंडी येथील महिला सरपंच श्रीमती द्रोपदी म्हात्रे यांचे पती कामकाजामध्ये हस्तक्षेप करीत आहेत असे या ठिकाणी सांगण्यात आले. त्यामुळे मला असे वाटते की, महिला सरपंच श्रीमती द्रोपदी म्हात्रे यांच्या पतीला शासनामार्फत सांगितले जाऊ शकते की, ज्यावेळी ग्रामपंचायतीच्या सभा असतात त्यावेळी आपण बैठकीच्या कक्षाबाहेर थांबावे. सभेमध्ये भाग घेऊ नये असे आपण त्यांच्या पतीला सांगू शकता. ग्रामसेवक, तालुका पंचायत अधिकारी किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याचे महिला सरपंच किंवा कोणत्याही महिला पदाधिकाऱ्यास सहकार्य नसेल तर पंचायत राज संस्थेच्या दृष्टीने ते योग्य होणार नाही. त्यामुळे मी या प्रश्नाच्या अनुषंगाने शासनाला विचारु इच्छितो की, या प्रकरणाची चौकशी तीन महिन्यात न करता एका महिन्यात पूर्ण करुन, शासन महिला सरपंचास संरक्षण देईल काय ?

श्री.रणजित कांबळे : होय.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उसगांव ग्रामपंचायतीमध्ये झालेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार

(७) * १३२०१ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील वसई येथील पूर्वेकडील उसगांव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व वसई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी संगनमत करुन ग्रामपंचायतीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे डिसेंबर २००५ मध्ये उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार ग्रामसेवक व गटविकास अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकरिता : (१) हेखरे नाही.

(२) ते (५) याबाबतच्या चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, या प्रश्नाच्या प्रश्न क्रमांक 2 ते 5 ला शासनातर्फे असे उत्तर देण्यात आले आहे की, "याबाबतच्या चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही." त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, गैरव्यवहार झाल्याची तक्रार कोणी केली होती ? तक्रारीचे स्वरुप काय होते ? आणि चौकशी कोणामार्फत करण्यात आली ? तसेच चौकशीचे निकष काय होते ?

श्री.रणजित कांबळे : महोदय, या गैरव्यवहाराबाबत आमच्याकडे तक्रार आली नव्हती.

श्री.विलास अवचट : आपल्याकडे तक्रारच आली नव्हती तर मग चौकशी का करण्यात आली ? कारण आपण उत्तरामध्ये म्हटले आहे की, "याबाबतच्या चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही." ज्याअर्थी चौकशी केली त्याअर्थी आपल्याकडे तक्रार प्राप्त झाली असावी. शिवाय शासनाकडून तक्रार करण्यासाठी चौकशी अधिकाऱ्याची सुध्दा नियुक्ती करण्यात आली.

श्री.रणजित कांबळे : महोदय, आमच्याकडे तक्रार आलेली नाही. चौकशीमध्ये सदरहू ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत काहीही आढळून आले नाही.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या गावामध्ये रोजगार हमी योजनेची कामे सुरु होती. या कामावर किती पैसा खर्च झाला, किती लोकांना रोजगार मिळाला, याबाबत ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांच्याकडे ग्रामपंचायतीने चौकशी करण्याची मागणी केली होती. तसेच गावामध्ये टँकर चालकाकडून वसूल केलेले 60 हजार रुपये ग्रामपंचायतीने कोणत्या कामावर खर्च केले याबाबत लोकांनी प्रश्न उपस्थित केला होता. पाच वर्षात किती लोकांना घरकुल योजनेचा लाभ मिळाला हा देखील प्रश्न विचारण्यात आला होता. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, जे काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते त्याबाबत आपण चौकशी केली आहे काय ?

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 13201

डॉ. नीलम गोऱ्हे ....

आपण आताच म्हणालात की, या संदर्भात केलेल्या चौकशीत आम्हाला काही आढळले नाही. सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगानेच मी आपल्याला काही स्पेसिफिक माहिती देते. पाण्याच्या टँकरच्या संदर्भात वसूल केलेले 60 हजार रुपये, तलावाचा लिलाव करुन मिळालेले 30 हजार रुपये यांचे काय झाले ? पाच वर्षांत किती लोकांना घरकुल योजनेचा लाभ मिळाला ? तसेच, रोजगार हमी योजनेंतर्गत घेतलेल्या तलावांवर किती खर्च करण्यात आला ? आणि त्यातून किती बेरोजगारांना रोजगार मिळाला ? असे सर्व प्रश्न या जनतेचे आहेत आणि आपण चौकशीमध्ये काही आढळले नाही, असे कसे काय म्हणता ? तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, आपण या सर्व गोष्टींसंदर्भात चौकशी कराल का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. तरी देखील, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी माहिती दिली तर आम्ही या संदर्भात ताबडतोब चौकशी करुन त्या संदर्भातील माहिती पटलावर ठेवतो.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, उसगांव ग्रामपंचायतीचे ऑडीट केव्हापर्यंत झालेले आहे. त्याचप्रमाणे ऑडीट करुन किती वर्षे झालेली आहेत ? त्यामध्ये काही गैरव्यवहार आढळला आहे का ? आणि जर काही गैरव्यवहार त्यामध्ये आढळला असेल तर आपण संबंधितांवर कारवाई केली आहे का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सदर ग्रामपंचायतीचे ऑडीट कोणत्या वर्षी झाले हे मला माहित नाही. रँडम ऑडीट होत असते. सन 2004-2005, सन 2005-2006 या वर्षींच्या कामांची पूर्ण माहिती माझ्याकडे आहे. त्या संदर्भातील वर्कवाईज माहिती मी आपल्याला देऊ शकतो. एखाद्या काळात पूर्ण एका पंचायत समितीचे ऑडीट होते. या ग्रामपंचायतीचे ऑडीट झाले आहे किंवा नाही याबाबत माझ्याकडे आता कन्फर्म माहिती नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, एका गंभीर प्रश्नाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये ठाकर समाजाच्या एका युवकाने जातीचे वैधता प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे कलेक्टर कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे. अध्यक्ष महोदय, हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. तेथील 3-4 उपोषकर्त्यांना हास्पिटलमध्ये हलवावे लागले आहे. या समाजाला पहिल्यांदा एस.टी.चे सर्टिफिकेट दिले जात होते. परंतु नंतर ते काढून त्यांना एन.टी.चे सर्टिफिकेट देण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्या संदर्भात त्या समाजाने माननीय हायकोर्टात अपील दाखल केले. माननीय हायकोर्टामध्ये अपील दाखल केल्यानंतर माननीय हायकोर्टाने त्या लोकांच्या बाजूने निर्णय दिला आणि त्यांना एस.टी.चे सर्टिफिकेट द्यावे असे शासनास डायरेक्शन दिले. परंतु शासनाने त्या निवाड्याविरुध्द माननीय सुप्रिम कोर्टात रिट पिटिशन दाखल केले. त्यासंबंधात माननीय मुंबई हायकोर्टाने जे जजमेंट दिले, तेच जजमेंट माननीय सुप्रिम कोर्टाने दिले. सभापती महोदय, जातीच्या वैधतेचे प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे नोकऱ्यांमध्ये असलेल्या दोनशे जणांवर एकप्रकारे अन्याय होत आहे. त्यामुळे ती मुले उपोषणास बसली आहेत. तरी, आपल्या माध्यमातून माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

सभापती : जात पडताळीच्या प्रमाणपत्रासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचा औचित्याचा मुद्दा आहे. तरी, जात पडताळणी प्रमाणपत्र ताबडतोब मिळण्यासंदर्भात माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला सूचना द्याव्यात.

श्री. हर्षवर्धन पाटील : ठीक आहे.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आज दुपारी दोन वाजता बजेट मांडले जाणार आहे. बजेट मांडण्याअगोदर कॉन्स्टिट्युशनला व्हायोलेट करणारी घडना घडत आहे. या ठिकाणी अनकॉन्स्टिट्युशनल असे काही घडत असल्यामुळे बजेटची सँक्टीटी संपुष्टात येणार आहे. तरी, यासंबंधी शासनाकडून खुलासा झाला पाहिजे. सभापती महोदय, मी तीन दिवसांपूर्वी आपणाकडे एक प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी आपण मला ॲडव्होकेट जनरल यांच्याकडून सल्ला घेण्याबाबत सांगितले. अध्यक्ष महोदय, हा प्रकार भयंकर आहे. या संदर्भात गव्हर्नर ऑफिसशी संपर्क साधून मी माहिती मिळविली. ती माहिती कळल्यावर मला असे वाटू लागले की, आपल्या बजेटमध्ये जे होत आहे, ते घडू देऊ नये. तरी, त्या अगोदर शासनाकडून या संदर्भात खुलासा झाला पाहिजे. सभापती महोदय, सप्लीमेंटरी बजेटमध्ये 263 कोटी रुपयांचे रि-ॲप्रोप्रिएशन केलेले आहे. माननीय राज्यपालांनी महाराष्ट्र शासनाला एक पत्रक काढले आहे. त्या संदर्भातील नियम मी आपणास वाचून दाखवितो.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

त्याच्या कलम 8 प्रमाणे, it has been stated as under: "Allocation of funds to be reflected in Annual Financial Statement. त्यात असा नियम आहे. It is further stated that: "The allocation of funds or outlays made by the Governor shall be reflected in the Annual Financial Statements to be placed before the State Legislature and the developmental activities with regard to the outlays as aforesaid, shall be carried out or caused to be carried out by the State Government and the funds so allocated shall be non divertible from the area of one Board to that of another Board." सभापती महोदय, सरकारने 263 कोटी रुपये जे जास्तीचे होते ते रि-ॲप्रोप्रिएशन मध्ये घेतलेले आहेत. ते एका बोर्डातून दुसऱ्या बोर्डाकडे डायव्हर्ड करता येत नाहीत. यामध्ये त्यांनी ते डायव्हर्ड केलेले आहेत. बजेटमध्ये येण्याच्या अगोदर फार मोठी नियमबाहय, घटनाबाहय वर्तणूक घडलेली आहे. यासंदर्भातील खुलासा इ ाल्याशिवाय आपणास पुढे जाता येणार नाही. यासंदर्भात 5 ऑगस्ट रोजी सरकारने जे राजपत्र काढले आहे त्याचाही आधार आपणाला घेता येईल ते दोन्ही नियम माझ्याकडे आहेत. त्यात त्यांनी म्हटलेले आहे की, Rules 6 and 7 reads as under: " If and when there is an occasion to revise the amount of development expenditure as communicated to the Governor, such change shall be intimated to the Governor immediately after the State Government decides on such a revision. and (7) The Governor may issue directives to the State Government allocating funds to various areas under the different Boards and, further, such directives of the Governor may indicate allocations to each sector or sub-sector as deemed fit by the Governor." सभापती महोदय, या ठिकाणी सभागृहामध्ये आपण ॲडव्होकेट जनरल यांना बोलविले होते. ॲडव्होकेट जनरल यांनी आपणाला एक लिखित पत्र दिले होते त्यात, At that time, the Advocate General opined as under: : Rule 7(6) is more important inasmuch as it mandates that if and

.....2....

श्री. नितीन गडकरी ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

when there is occasion to revise the amounts of development expenditure as communicated to the Governor, such change shall be intimated to the Governor immediately after the State Government decides on such review." हे ॲडव्होकेट जनरलचे लिखित ओपिनिअन आहे. जेव्हा जेव्हा सरकारला अशा प्रकारे कोठलाही फंड वाटावयाचा असेल तेव्हा त्यांनी माननीय राज्यपाल महोदयांना त्याची माहिती दिली पाहिजे. यासंदर्भात दोन कायदे आहेत, व ॲडव्होकेट जनरलचे ओपिनिअन आहे. याबाबत सरकारने काय केले 263 कोटी रुपये रि-ॲप्रोप्रिएशनचे आणि 778.68 कोटी रुपये असे मिळून 1041 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी सरकारने राज्यपाल महोदयांना न सांगता, त्यांनी नियोजन विभागाच्या सचिवांना 2 पत्रे पाठवून सांगितले की, तुम्ही 4 हजार कोटी रुपये इरिगेशन विभागासाठी आरक्षित करण्यास जरी सांगितले असले तरी राज्य सरकारची आर्थिक स्थिती चांगली नाही, त्यामुळे आम्ही एवढयाच रकमेची तरतूद करु शकतो. तेवढी तरतूद केली आणि राज्यपाल महोदयांच्या निकषाप्रमाणे विभागवार वाटली. 263 कोटी रुपये रि-ॲप्रोप्रिएशनचे आणि 778.68 कोटी रुपये अतिरिक्त तरतूद, मग ही अतिरिक्त तरतूद आली कोठून, राज्यपाल महोदयांच्या सांगण्याप्रमाणे बजेटमधील इरिगेशनच्या हेडमध्ये ही रक्कम समाविष्ट का झालेली नाही. आणि या बाबतीमध्ये माननीय राज्यपाल महोदयांना माहिती देऊन त्यांच्या निकषाप्रमाणे वाटप करण्याचे नियम असतांना, अशी घटना असतांना, असे डायरेक्शन असतांना मंत्रालयामध्ये बसून इरिगेशन विभागाने हे पैसे वाटून टाकले हे अतिशय गंभीर बाब आहे, It is a violation of the provisions of the Constitution of India It is a violation of hon. Governor's guide-lines. It is a violation of Government Rules also. ॲडव्होकेट जनरल यांनी सांगितले आहे की "In my view, the Governor has a power to amend or modify any directives issued by him." श्री. कदम नावाचे ॲडव्होकेट जनरल आहेत त्यांनी यांच्या वतीने एक पत्र लिहीले व राज्यपाल महोदयांना सांगितले की, तुम्ही डायरेक्टीव्ह दिलेल्या आहेत. परंतु सरकारची परिस्थिती एवढे पैसे देण्याची नाही. तरी आम्ही एवढा फंड अलॉट करतो आम्हाला परवानगी द्या. त्यांच्या पत्राला राज्यपाल महोदयांनी परवानगी दिलेली आहे. त्यांचे पत्र आहे

....3....

श्री. नितीन गडकरी ...

त्यांच्या पत्रात असे म्हटलेले आहे की," I am directed to enclose the Directives of the Governor of Maharashtra under Clause 7 of the Development Boards for

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Vidarbha,Marathwada and the rest of Maharashtra Order,1994 regarding the region-wise allocation of outlay in the Irrigation Sector in the Annual Plan 2006-2007 for necessary action ." यानंतर पत्र पाठवून त्यांनी राज्यपाल महोदयांना विनंती केली, तेव्हा राज्यपाल महोदयांनी त्यांची विनंती मान्य केली.

(सभापती स्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

जसे माननीय राज्यपालांना निदेश देण्याचे अधिकार आहेत. तसेच त्यांनी दिलेल्या निदेशामध्ये सुधारणा केलेली आहे. त्यामुळे 1041 कोटी रुपये वाटून कसे घेतले ? हा प्रश्न निर्माण होतो. माझ्ा मूलभूत व घटनात्मक मुद्दा असा आहे की, 1041 कोटी रुपये + आज दुपारी 2.00 वाजता सादर होणा-या अर्थसंकल्पामध्ये पाटबंधारे खात्याची असलेली एक्स इतकी रक्कम अशी एकूण एक्स रक्कम + 1041 कोटी रुपये राहिली असती. त्यामुळे ही 1041 कोटी रुपयांची रक्कम निकषाप्रमाणे वाटलेले आहेत काय ? जोपर्यंत या 1041 कोटी रुपयांचा खुलासा होत नाही तो पर्यंत अर्थसंकल्प सादर मांडण्यास काही अर्थ राहणार नाही. हा संविधानाचा भंग आहे.

श्री.वसंतराव शिंदे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे की, या सभागृहामध्ये अर्थसंकल्पाच्या तरतुदीबाबत चर्चा सुरु असल्यामुळे अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी अशी चर्चा होऊ शकते काय ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी या ठिकाणी अर्थसंकल्पाबाबत बोलत नसून सप्लीमेंटरी बजेटबाबत बोलत आहे. परंतु बजेटमध्ये एकसमानता आणण्यासाठी बजेटमध्ये असलेल्या रकमेमध्ये 1041 कोटी रुपयांचा समावेश करुन यायला पाहिजे होते. कारण त्याला माननीय राज्यपालांचे निदेश लागू आहेत. ए.जी. आणि आपल्या नियमाप्रमाणे अशा प्रकारची कोणतीही तरतूद करण्यापूर्वी माननीय राज्यपालांना कळवून मगच त्या रकमेचे वाटप करावयास पाहिजे होते. परंतु ही रक्कम वाटण्यासाठी माननीय राज्यपालांची कोणत्याही प्रकारे परवानगी न घेता, त्यांना कोणत्याही प्रकारे न कळवता पाटबंधारे खात्याची बजेटमधील रक्कम कमी करुन, दुस-या मार्गाने रु.1041 कोटी रुपये काढले, व वाटून घेतले हा संविधानाचा भंग आहे.

उपसभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, पुरवणी मागणीवरील चर्चा उद्या असल्यामुळे आपण या विषयावर उद्या बोलावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी पुरवणी मागणीवर बोलत नाही. मी आपल्याला एकच विनंती करु इच्छितो की, माननीय सभापती यांनी मला असे आश्वासन दिले होते की, दोन दिवसांच्या आत या विषयाबाबत ए.जी. कडून खुलासा करुन घेऊन माहिती देतो. आज दुपारी 2.00 वाजता अर्थसंकल्प सादर होणार आहे. याबाबत मी आपल्याकडून काहीतरी खुलासा होण्याची वाट पहात होतो. परंतु आपल्याकडून कोणताही खुलासा न आल्यामुळे मी आज दुपारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे 13:10

श्री.नितीन गडकरी .....

1.00 वाजता या ठिकाणी बोलण्यासाठी उभा राहिलो. माझी आपल्याला प्रामाणिकपणे विनंती आहे की, 1041 कोटी रुपयांचे झालेले वाटप असंविधानिक आहे, बेकायदेशीर आहे. 1041 कोटी रुपयांचे मूळ अंदाजपत्रकामध्ये समावेश करायला पाहिजे होता. यामधून फार मोठी डिस्पायरी निर्माण झाली आहे, डिस्क्रीनेशन निर्माण झाले आहे, ही बाब अनडेमोक्रॅटीक आहे. एका विशिष्ट वर्गाच्या लोकांनी काही लोकांना फसविण्याकरीता केलेले षडयंत्र आहे. म्हणून याबाबतचा जो पर्यंत खुलासा होणार नाही तो पर्यंत आम्ही बजेट ऐकणार नाही. या बजेटला काही अर्थ राहणार नाही, यामुळे मागासलेल्या भागांवर अन्याय होणार आहे. या प्रकरणामध्ये 1041 कोटी रुपये पळवून नेलेले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. जर माझे काही चूकत असेल तर आपण मला खाली बसण्यासाठी सांगावे, मी खाली बसेन. परंतु मी या ठिकाणी घटनेच्या आधारावर व नियमांच्या आधारावर बोलत आहे. या आधी मी मुद्दा उपस्थित केला होता की, हे पैसे वाटले यासाठी माननीय राज्यपालांची परवानगी होती काय ? मला काल मिळालेल्या माहितीप्रमाणे माननीय राज्यपालांची कोणतीही परवानगी न घेता हे पैसे वाटण्यात आलेले आहेत. याबाबतचा खुलासा होणे अत्यावश्यक आहे. 1041 कोटी रुपये ही पाटबंधारे विभागाचा एक भाग समजून मूळ अर्थसंकल्पात 1041 कोटी रुपयांचा समावेश करुन माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे रकमेचे वाटप करायला पाहिजे होते. याबाबत आपण लॉ सेक्रेटरींशी कंसल्ट करावे. किंवा या ठिकाणी पुन्हा एकदा ए.जी.ना बोलवावे. मी या ठिकाणी प्रत्येक मुद्दा घटनेचा आधार घेऊन बोलत आहे. मला कोणाचीही कृपा नको. सभापती महोदय, याबाबत आपण निर्णय द्यावा अशी माझी औचित्याच्या मुद्दयाच्या निमित्ताने आपल्याला विनंती आहे.

(यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी औचित्त्याचा मुद्द्याद्वारे जो विषय येथे मांडला आहे ते दोन विषय निरनिराळे आहेत. एक तर आता येथे थोड्या वेळानंतर म्हणजे दुपारी 2.00 वाजता या वर्षीचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.गडकरी येथे जे निवेदन करीत आहेत ते 2005-06 च्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात आहे. तेव्हा त्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा जेव्हा येथे होईल त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी आपले हे विचार जरूर मांडावेत. परंतु आता दुपारी 2.00 वाजता या वर्षीचा म्हणजे 2006-07 चा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे त्याबाबतीत जर चर्चा त्यांना करावयाची असेल तर तीही नंतर त्यांना करता येऊ शकते. या दोन्ही बाबी स्वतंत्र आहेत. एवढेच मला या बाबतीत सांगावयाचे आहे.

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना आता तेच सांगितले आहे की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा उद्या आहे त्यावेळी त्यांना ते आता जे मुद्दे मांडत आहेत ते मांडता येतील. दुसरे म्हणजे अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी देखील आपल्याला याबाबत बोलता येईल. ..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी मांडलेले तीनही मुद्दे इल्लीगल आहेत काय ? तसे असेल तर आपण स्पष्टपणे मला सांगावे. ...

उपसभापती : मी आपल्या औचित्त्याच्या मुद्यावर निर्णय देतो आहे ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, तो देण्याअगोदर मी जे तीन मुद्दे येथे मांडलेले आहेत ते आपण खोडून काढावेत, ते चुकीचे आहेत, बेकायदेशीर आहेत, असे स्पष्टपणे सांगावे. ही किती मोठी गंभीर गोष्ट आहे हे आपण लक्षात घ्यावे. वाटल्यास आपण याबाबत आपल्या अधिकाऱ्यांकडून, कायदा खात्याच्या अधिकाऱ्यांकडून अभिप्राय घ्यावेत. मी जे मुद्दे येथे मांडले आहेत त्यावर निर्णय झाला नाही तर मग बजेटला अर्थ काय राहणार आहे ? बजेटमधील आमचे हजार कोटी रूपये अगोदरच सरकारने पळवून नेले आहेत. त्याबद्दल प्रथम आम्हाला खुलासा हवा आहे.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना या मुद्यावर चर्चा येथे घडवून आणावयाची असेल तर त्यांनी ती वेगळ्या प्रकारे घडवून आणावी. त्यासाठी त्यांना अनेक मार्ग आहेत ...

.... एफएफ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना सांगू इच्छितो की, आपल्याला अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी हे मुद्दे येथे मांडता येतील आणि त्यावर वित्त मंत्र्यांकडून खुलासा देखील घेता येईल. अर्थसंकल्प सादर करणे ही संवैधानिक बाब आहे. तेव्हा मी आपल्याला विनंती करीन की, ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, असे होते तर मग मी जेव्हा हे मुद्दे आपल्यापुढे म्हणजे माननीय सभापतींपुढे मांडले होते तेव्हा दोन दिवसात याबाबत लीगल अधिकाऱ्यांकडून खुलासा करवून घेतो असा निर्णय दिला होता. तो निर्णय रेकॉर्डवर आहे वाटल्यास आपण ते रेकॉर्ड तपासून घेऊ शकता.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला सभापतींनी जो निर्णय दिलेला होता की, दोन दिवसात कायदेशीर सल्ला घेऊन सांगतो. त्यावेळचे आपले मुद्दे वेगळे होते असे मला वाटते. म्हणून मी आपल्याला एक विनंती करीन की, ..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला माफ करावे. मी परवा आपल्याला म्हणजे माननीय सभापतींना हेच विचारले होते की, हे 1,062 कोटी पैकी 700 कोटींचे जे ॲलोकेशन केले आहे, As far as the opinion of the Advocate General is concerned, 7.6 नियमानुसार तुम्ही ताबडतोब अशा प्रकारे सरप्लस अमाऊंट निघाल्याबरोबर, सरकारचे हे पहिले घटनात्मक कर्तव्य आहे की, या गोष्टीचा रिपोर्ट लागलीच माननीय राज्यपालांना द्यावयाचा. माननीय राज्यपालांच्या परवानगीने त्याचे अलोटमेंट कसे करावयाचे असते. तुम्ही इरिगेशनचे बजेट करताना वारंवार त्यांचे पत्र घेत असता, नियम रिलॅक्स करण्यासाठी देखील त्यांचे पत्र घेता. पण या हजार कोटी रूपयांच्या बाबतीत मात्र असे काहीच केलेले नाही. राज्यपालांना कोठलेही पत्र नाही, सूचना नाही. आणि परस्पर तुम्ही हे पैसे वाटून टाकता. हे सरकारचे कृत्य सरासर घटनाबाह्य आहे. सभापती महोदय, मी जे काही हे सांगतो आहे त्यामध्ये एक चूक असेल तर मी या सभागृहात देखील राहणार नाही, आमदार म्हणून देखील येथे प्रवेश करणार नाही. मुंबई हायकोर्टामध्ये या विषयी प्रेअर टाकली तर त्याला चार वर्षे झाली अजून हिअरींग घेत नाहीत. सभागृहामध्ये ॲडव्होकेट जनरलचे ओपिनिअन झाले, त्यावर न्याय मिळत नाही. सभापती महोदय, शेवटी हे सभागृह कोठल्या तरी नियमानुसार चालले पाहिजे, घटनेनुसार

..... एफएफ 3 ...

श्री. गडकरी .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चालले पाहिजे. मी मांडलेल्या मुद्यातील एक शब्द जरी चूक असेल तर ... सन्माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार यांना मी विनंती करू इच्छितो की, आपण कृपया उभे राहून हे सांगावे की, आपण हे जे 1062 पैकी 700 कोटीचे वाटप केलेले आहे ते राज्यपालांची परवानगी घेऊन केलेले आहे का ? आपण जे हे वाटप केलेले आहे ते योग्य आहे, नियमाने केलेले आहे असे आपण सांगू शकता काय ? आपण तसे सांगावे, मी खाली बसतो. मग विषय संपला. सभापती महोदय, मी आपल्याला कळकळीने सांगू इच्छितो की, बजेटपूर्वीच या सरकारने हजार कोटी रूपये पळविले आहेत. ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. हे अगोदरच स्पष्ट करून घेतले गेले नाही तर त्या बजेटला काही अर्थच नाही. माननीय अर्थमंत्र्यांची ही हुशारी आहे, चलाखी आहे. ... सभापती महोदय, वाटल्यास आपण आपल्या सक्रेटरीला एवढेच सांगावे की, त्यांनी रूम मध्ये जाऊन माननीय राज्यपालांच्या विभागाला फोन करून विचारावे की, या हजार कोटी रूपयांच्या अलोकेशनला तुमची परवानगी घेतली आहे किंवा नाही ? त्यांची परवानगी न घेताच हे सारे केलेले आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी जे मुद्दे येथे उपस्थित केलेले आहेत त्याच्या बाबतीत राज्य सरकारने ज्या पुरवणी मागण्या मांडलेल्या आहेत त्यावर चर्चा येथे होणार आहे आणि त्यावर शासनाच्या वतीने उत्तर देखील मिळणार आहे. त्या चर्चेच्या वेळेस सन्माननीय सदस्यांनी त्यांचे हे मुद्दे जरूर उपस्थित करावेत. त्याबद्दलचे उत्तर राज्य सरकार निश्चितपणे देईल. विरोधी पक्षनेता वा सदस्यां कडून जे काही मुद्दे येथे उपस्थित होतील त्यावर उत्तर देणे, खुलासा करणे हे आमचे, सरकार पक्षाचे कामच आहे. तेव्हा त्यांच्या मुद्यांवर जरूर आम्ही उत्तर देऊ.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा आपल्याला प्रश्न आहे. हे सभागृह म्हणजे कायदेमंडळ आहे. या सभागृहात नियमाने कामकाज चालविण्याची पद्धत आहे. या सभागृहामध्ये मंत्र्यांचे, सदस्यांचे अधिकार हे डिफाईन केलेले आहेत. या सभागृहाला कॉन्स्टिटयूशनचा आधार आहे. मी घटनेतील तिन्ही नियमांच्या आधारे आणि याच सभागृहामध्ये येथे बसून दिलेल्या ॲडव्होकेट जनरलच्या ओपिनियनच्या आधारे हे तिन्ही मुद्दे तुमच्याकडे दिलेले आहेत. ... तेच मी सांगतो आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे .... जीजी 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. नितीन गडकरी...

हे सभागृह घटनेतील तरतुदीप्रमाणे चालणार आहे कां? आणि त्याप्रमाणे चालले नाही तर पिठासीन अधिकारी म्हणून या सभागृहाचे कामकाज घटनेतील तरतुदीप्रमाणे चालेल असे आपण सांगणार काय? माननीय राज्यपालांची शासनाने परवानगी घेतली पाहिजे असे लिहिले असतांनाही घेतली नाही तरी आपण शासनाला परवानगी देणार काय? माझे म्हणणे चुकीचे असेल तर आपण मला निर्देश द्या. मी आपला आदर, सन्मान करुन सांगतो की, मी उपस्थित केलेल्या तीन मुद्दयांपैकी एक जरी मुद्दा बरोबर नाही असे आपण सांगितले तरी मी खाली बसेन. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण पाच-दहा मिनिटांसाठी हे सभागृह तहकूब करावे. आणि मी या सभागृहामध्ये उपस्थित केलेले सर्व मुद्दे आपण कायदेशीररीत्या तपासून घ्यावेत. सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी मला खुलासा मिळेल याकरीता एक वाजेपर्यंत थांबलो होतो. सभागृहामध्ये दोन वाजता अर्थसंकल्प मांडल्यानंतर हा विषय मांडण्याचा माझा अधिकार जाईल. आणि त्यामुळे या हजार कोटीच्या बाबतीत मी काहीही करु शकणार नाही. हे पैसे त्या अर्थसंकल्पामधील तरतुदीचा एक भाग होऊन जातील...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गडकरी हे सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. त्यांनी मांडलेली भूमिका पूर्णपणे चुकीची आहे. याबाबत त्यांना पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या वेळी भूमिका मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे...

श्री. नितीन गडकरी : माननीय राज्यपालांच्या परवानगीशिवाय पैसे वाटले हे बरोबर आहे काय?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी औचित्याच्या मुद्दयाव्दारे या ठिकाणी घटनात्मक बाबीसंबंधी प्रश्न उपस्थित केले आहेत. माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश आणि घटनेतील असलेल्या तरतुदींच्या संदर्भात त्यांच्या मनात काही शंका आहेत. त्या शंका उपस्थित करीत असतांना या सभागृहामध्ये ज्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत त्यांचा आधार घेऊन ते या ठिकाणी चर्चा करीत आहेत. आणि म्हणून माननीय सदस्यांचे म्हणणे काय आहे, त्यामधील सत्यता काय आहे, त्यामध्ये आणखी काही फॅक्ट्स आहेत यासंबंधी माननीय जलसंपदा मंत्र्यांनी उभे राहून पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्यावेळी शासनातर्फे त्यासंबंधी उत्तर देण्यात येईल असे सांगितले आहे. सभागृहापुढे मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांचा आधार घेवून एखादा विषय सभागृहासमोर आणावयाचा आणि ती बाब बजेटमध्ये येणार आहे की नाही यासंबंधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

औचित्याच्या मुद्दयाच्या निमित्ताने माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये आपली बाजू मांडावयाची त्यावेळी तो औचित्याचा मुद्दा लागू आहे की गैरलागू आहे यासंबंधीचा निर्णय माननीय सभापतींनी देणे अभिप्रेत आहे. आणि म्हणून या संदर्भात अधिक वेळ घालविण्याऐवजी आपण याठिकाणी निर्णय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : मी यापूर्वी दिलेला निर्णय कायम आहे. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी माननीय सदस्यांना त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे मांडता येतील आणि त्या मुद्यांबाबत माननीय वित्तमंत्री त्याचे उत्तर देतील. अर्थसंकल्प सभागृहाला सादर करणे ही संविधात्मक बाब आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांना उद्या होणाऱ्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी उत्तर मिळेल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या आसनावरुन मी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत एक-दोन दिवसात निर्णय दिला जाईल असे आश्वासन मिळाले आहे. या गोष्टीला आज तीन दिवस होऊन गेले. आज दुपारी 2 वाजता अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. मला आपल्याला प्रश्न विचारावयाचा आहे. दोन दिवसामध्ये याबाबत वैधानिक चर्चा करुन निर्णय देईन असे आपण मला आश्वासन दिले आहे. आपण दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मी दुपारी 1 वाजेपर्यंत वाट पाहिली आहे. मी मांडलेले मुद्दे योग्य आहेत की अयोग्य आहेत यासंबंधी आपण मला निर्णय दिल्यास मी शांत राहीन.

उपसभापती : मी या संदर्भात आपल्याला मघाशी हेच सांगितले आहे की, या आसनावरुन आपल्याला असे सांगण्यात आले की, दोन दिवसामध्ये या मुद्यांबाबत वैधानिक चर्चा करुन त्यासंबंधीचा निर्णय दिला जाईल. माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण त्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे आज उपस्थित केलेल्या मुद्यांपेक्षा वेगळे होते...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आज मांडलेले मुद्दे त्या दिवशी मांडले होते. कॉटीजन्सी फंडामधील 778 कोटी रुपये व रिॲप्रोप्रिएशनचे 263 कोटी रुपये असे मिळून 1041 कोटी रुपयांचे अलोकेशन करण्यात आले. ते करण्यासाठी माननीय राज्यपालांची परवानगी घेतलेली नाही. माननीय राज्यपालांची परवानगी घेण्यात आलेली नाही हेच याठिकाणी व्हायोलेशन आहे. मी त्या दिवशी जो विषय मांडला तोच आज मांडीत आहे, आज उपस्थित केलेले मुद्दे नवीन नाहीत. आपण हवे असेल तर सभागृहाच्या कामकाजाचे इतिवृत्त तपासून पहावे. मी उपस्थित केलेले मुद्दे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

असंवैधानिक आहेत, लिगली नाहीत यावर आपण मला निर्णय दिल्यास मी शांत राहीन. **उपसभापती** : आपण उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत मी निर्णय दिलेला असल्यामुळे आता पुढील कामकाजाकडे जावू.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, तरमग आपण दिलेले आश्वासन मी विसरुन जावू कां? त्या संदर्भात आपल्याला खुलासा करावयाचा नाही असे मी समजावे कां? सरकार न्याय देत नाही आणि आपणही माझ्या कायदेशीर मुद्यांबाबत न्याय देणार नाही कां?

उप सभापती : मी आपल्याला प्रामाणिकपणे न्याय दिला आहेआपण त्या दिवशी उपस्थित केलेले मुद्दे आज उपस्थित केलेल्या मुद्यांपेक्षा वेगळे होते...

(यानंतर श्री.किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण पाच मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज थांबवून रेकॉर्ड पहावे. राज्यपालांच्या परवानगीशिवाय पैसे वाटप करणे योग्य आहे काय ?

श्री.पांडुरंग फुंडकर : माझा एवढाच मुद्दा आहे की, आपण त्यावेळेस आश्वासन दिलेले होते, त्याप्रमाणे आपला निर्णय द्यावा...

...अडथळा...

उपसभापती : आता शोकप्रस्ताव घेऊ.

....अडथळा...

श्री.हर्षवर्धन पाटील : उपसभापतींनी आपला त्यांनी निर्णय दिलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही शोक प्रस्तावावर गडबड करावी अशी अपेक्षा आहे काय ? आपण या विषयाची माहिती घेण्यासाठी सभागृह तहकूब करावे. आम्हाला दोन दिवसाची मुदत दिलेली होती. ती आज 1-00 वाजेपर्यन्त मुदत होती.

...अडथळा...

श्री.रमेश निकोसे : माझा औचित्याचा मुद्दा आहे.नागपूर येथील श्री. मेश्राम या मागासवर्गीय व्यक्तीच्य घराला आग लावण्यात आली.....(अडथळा)...

श्री.हर्षवर्धन पाटील : वेगळ्याच विषयावर सन्माननीय सदस्य बोलत आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अत्यंत अन्याय करणारे अशाप्रकारे निधीचे वाटप झालेले आहे. पुरवणी मागण्या चर्चेला येतील, त्यावेळेला आम्ही उत्तर घेऊ. आपला जो काही निर्णय आहे, तो आम्ही मान्य करतो. अंदाजपत्रक सादर होते, तेव्हा दरवेळेला आम्ही आग्रह धरतो. याही वेळी तसा आग्रह धरण्याची पाळी येऊ नये, नियम 93 ची सूचना देण्याची पाळी येऊ नये. अनुपालन अहवाल द्यावा म्हणजे जिल्हावार निधी वाटप केलेला आहे हे पाहून त्यावर चर्चा करु. दुसरा महत्वाचा सेन्सीटिव्ह मुद्दा असा आहे की,आपल्याकडून आश्वासन मिळालेले आहे. त्याबाबतची ठाम माहिती मिळाली तर पुढच्या कामाला सुरुवात होऊ शकेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपण कागदपत्रे वाचावीत. त्याबाबत या सचिवालयातील अधिकाऱ्यांना बोलवावे. आपल्याला पटले नाही तर माझा मुद्दा फेटाळून लावला तर मी एका अक्षरानेही काही बोलणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मांडलेला मुद्दा गंभीर आहे. पुरवणी मागण्यांवर चर्चा होणर आहे, त्यावेळेस आम्ही बोलू, हे आम्हाला मान्य आहे. परंतु कायदेशीर मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्याबाबत आपल्याकडून स्पष्टीकरण मागितलेले आहे, त्याबाबतचा कोणताही खुलासा आपल्याकडून झालेला नाही. पुढे बजेट मांडले गेले, पुरवणी मागण्या मांडल्या गेल्यानंतर रिडंडंट इन्स्टंट रहाणार नाही.

उपसभापती : या मुद्याच्या संबंधात स्वत:ला क्लॅरिफिकेशन करुन घेण्यासाठी सभागृह पाच मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 1वाजून 28 मिनिटांनी 1 वाजून 35 वाजेपर्यन्त स्थगित झाले.)

यानंतर श्री.बरवड....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला एवढीच विनंती आहे. मघाशी असा निर्णय दिला की, पुरवणी मागण्यांच्या वेळी चर्चा करा, तो निर्णय मी मान्य केला. बजेटच्या चर्चेच्या वेळी बजेटच्या बाबतीत मांडावे हेही मी मान्य केले. आपला आदेश मला शिरसावंद्य आहे. सभापती महोदय, आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. हे सभागृह नियमाने चालणे, भारतीय घटनेच्या नियमाप्रमाणे त्याची अंमलबजावणी होणे, ती अंमलबजावणी होत आहे की नाही हे पाहणे आवश्यक आहे. हे कायदेमंडळ आहे आणि कायदे हे घटनेच्या आधारावर होतात. आपण आमच्या घटनापीठाचे महाराष्ट्राचे प्रमुख आहात. माझी आपल्याला विनंती आहे की, मी जे दोन मुद्दे उपस्थित केलेले होते त्यामध्ये हे जे 1062 कोटी रुपये आहेत त्याला कलम 371 (2) (8) अन्वये जी तीन कलमे मी वाचून दाखवली त्याप्रमाणे माननीय राज्यपालांची परवानगी घेणे आवश्यक आहे. ती परवानगी सरकारने घेतली की नाही ? मी चौकशी केली. मला माननीय राज्यपालांकडून असे कळले की, परवानगी घेतलेली नाही. तेव्हा याबाबतीत व्हायोलेशन झालेले आहे. म्हणून याबाबतीतील जो मुद्दा आहे, दोन्ही मुद्दे माझ्याकडे आहेत, ते मी रिपीट करीत नाही, माझ्या सगळ्या मुद्यांबाबत मी आपले आणि सभागृहाचे म्हणणे ऐकण्यास तयार आहे. माझे असे म्हणणे आहे की, केवळ आपण पोस्टमनच्या भूमिकेतून माझे म्हणणे ॲडव्होकट जनरल यांच्याकडे पाठवावे आणि त्यांचे लेखी मत सभागृहासमोर येऊ द्यावे. दोन तीन दिवसात त्यांचे मत येईल. ते योग्य असेल तर सरकार त्यावर विचार करील. माझे चुकीचे असेल तर मी माझे म्हणणे मागे घेईन. सभागृहाचा वेळ घेतला म्हणून मी सभागृहाची क्षमा मागेन. मी दिलगिरी व्यक्त करीन. या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून, आपण लोकशाही स्वीकारलेली असताना, भारतीय घटना असताना, माझ्या अधिकाराचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. आपण हे पूर्ण प्रकरण ॲडव्होकेट जनरलकडे पाठवावे. दोन तीन दिवसात त्यांचे मत मागवावे आणि मग आम्हाला न्याय द्यावा अशी आपल्याला हात जोडून विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 371(2) चे कॉन्स्टीटयूशनल मेकॅनिझम महाराष्ट्रात लागू झाल्यापासून जे अनेक व्हायोलेशन्स झाले त्यामध्ये आणखी एक ॲडिशनल भर पडलेली आहे आणि it is for the first time. यापूर्वी असे होत होते की, डायरेक्शन्सचे व्हायोलेशन करताना निदान त्यांना कळविले जात होते की, आम्ही या या कामासाठी असे असे करीत आहोत. It is for the first time. डायरेक्शन्सचे व्हायोलेशन करुन 1062 कोटी रुपयांच्या बाबतीत त्यांची परवानगी घेण्याचे तर सोडाच पण त्यांना कळविले सुध्दा नाही. सभापती महोदय, या ठिकाणी घटनेच्या मुद्यावर आपल्याकडून निर्णय मागणे मला स्वत:ला उचित वाटत नाही. माझे असे म्हणणे आहे की, हा जो मुद्दा आहे तो उचित आहे काय याबाबत ॲडव्होकेट जनरलचे मत घेऊन ते आम्हाला प्रसृत केले जावे. याचे कारण असे की, मागासलेल्या विभागांना निदान ॲडव्होकेट जनरलचे मत जाणून घेण्याचा अधिकार नाकारला जातो असे चित्र बाहेर येऊ नये एवढीच या निमित्ताने आपल्याला विनंती आहे. माननीय मंत्रिमहोदयांना सुध्दा मी अशी विनंती करतो की, त्यांनी या गोष्टीला नाही म्हणून नये. पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळी पुरवणी मागण्यांबाबत जे काही सांगावयाचे आहे ते आम्ही सांगू. बजेट सादर झाल्यानंतर बजेटवरील चर्चेत काय बोलावयाचे ते आम्ही बोलू आणि आपल्याला काय उत्तर द्यावयाचे ते आपण द्यावे. परंतु हे जे व्हायोलेशन झालेले आहे, परवानगी घेतली असेल किंवा त्यांना कळविले असेल तर तेही आपल्याला सांगता येईल. तो भाग नाही. तेव्हा याबाबतीमध्ये ॲव्होकट जनरलचे मत जाणून घेण्याचा आमचा अधिकार नाकारला जाऊ नये आणि हे आदेश आपणच देऊ शकता म्हणून आपल्याला विनंती आहे की, आपण तसे आदेश द्यावेत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी आपणास जी सूचना केली आहे, जी विनंती केली आहे त्यास अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. आम्ही ही गोष्ट मान्य केली की, या सभागृहामध्ये पुरवणी मागण्यावर, अर्थसंकल्पावर जेव्हा चर्चा होईल त्यावेळी आम्हाला जे काही बोलायचे आहे ते जरुर बोलू. आज दुपारी 2.00 वाजता अर्थसंकल्प सादर करण्यात येईल. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, त्यांना माननीय राष्ट्रपतींकडून मिळालेली माहिती चुकीची असेल तर ते आपले शब्द मागे घेतील. परंतु ती माहिती चुकीची नसेल तर ती गंभीर गोष्ट आहे. प्रत्येक वेळी घटनेचे व्हायलेशन होत आहे, राज्यपालांचे डायरेक्टीव्हज् डावलले जात आहेत. महाराष्ट्र राज्याला ही बाब भूषणावह नाही. या दृष्टीकोनातून सभापती महोदय, आमची आपणास अशी विनंती आहे की, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात आपण ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेऊन ते सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना कळवावे, आवश्यकता असेल तर त्यावर चर्चा देखील घडवून आणावी. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी उपस्थित केलेले मुद्दे व्हॅलिड असून त्यांची योग्य ती दखल घ्यावी, एवढीच आपणास विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सदनामध्ये दोन-तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. तसेच माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी देखील काही मुद्दे उपस्थित केले. यासंदर्भात सरकारच्यावतीने कायदेशीर मत घेण्यामध्ये कोणतीही अडचण नाही. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत त्यांना पुरवणी मागण्यांवरील तसेच अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी बोलता येईल. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मूलभूत प्रश्नासंबंधी कायदेशीर सल्ला घेण्यास शासनाची संमती आहे. त्याबाबतीत योग्य तो खुलासा सभागृहामध्ये करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सदनामध्ये अत्यंत महत्वाचे असे दोन-तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी देखील त्या संदर्भात आपले विचार मांडलेले आहेत. त्यावर माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी आपला अभिप्राय सुध्दा दिलेला आहे. सभागृहाच्या दोन्ही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मा. सभापती...)

बाजूच्या माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मी सांगू इच्छितो की, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या तीन मुद्यांच्या बाबतीत मी कायदेतज्ज्ञांचे मत जरुर घेईन. तसेच आवश्यकता असेल तर ॲडव्होकेट जनरल यांचेही मत घेईन आणि येत्या तीन-चार दिवसात या बाबातीतील अभिप्राय सभागृहाला सांगेन.

श्री. नितीन गडकरी : हे अभिप्राय माननीय सदस्यांना सर्क्युलेट करावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती : ते अभिप्राय सभागृहात देण्याची व्यवस्था करण्यात येईल. आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविलेला "शोक प्रस्ताव" हा विषय उद्या घेण्यात येईल. दुपारी 2.00 वाजता अर्थसंकल्प सादर करण्यात येईल. तोपर्यन्त मी सभागृहाची बैठक तहकूब करतो.

(1.58 ते 2.00 बैठक स्थगित झाली.)

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(**सभापतीस्थानी मा. सभापती**)

पृ.शी./मु.शी.: सन 2006-07 चा अर्थसंकल्प सादर करणे.

डॉ. सुनील देशमुख (अर्थराज्यमंत्री): सभापती महोदय, सन 2006-07 चा अर्थसंकल्प मी सभागृहाला सादर करीत आहे.

(प्रेस : येथे सोबतचे भाषण छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन् 2006-07 चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर झाला आहे. अर्थसंकल्पाची प्रकाशने सूटकेससह माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे तळमजल्यावरील वितरण केंद्रामध्ये करण्यात आली आहे. सदस्यांनी तेथून ती घ्यावीत.

डॉ. सुनील देशमुख : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2005-2006 ची प्रकाशने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : आर्थिक पाहणीची प्रकाशने सभागृहाला सादर झाली आहेत.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या, बुधवार, दिनांक 22 मार्च 2006 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 3 वाजून 38 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 22 मार्च 2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही